# काव्यकिरीट



यशवंत

स. ग्रं. मं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ७२७

REFBK-0006043
REFBK-0006043

राहुरकर यांच्या स्मरणार्थ संस्थेस भेट.

डिसेंबर १९४०

८०२१

मराठी ग्रंथ संग्रहालय

स्वतंत्र प्रत

क्र. का/०५ नं. १२०८

ता. २८।१२।४१

REFBK 0006043

REFBK-0006043



श्रीमंत सरकार प्रतापसिंह महाराज गायकवाड

सेना खासखेल, समशेर बहादर



श्रीमंत सौ. महाराणी शांतादेवी गायकवाड

# काव्य किरीट

## श्रीमंत प्रतापसिंह महाराज गायकवाड

यांच्या

राज्याभिषेकाचें काव्य

कवि

यशवन्त

प्रकाशक :—विष्णु पांडुरंग नेने, बी. ए.
हुजूर कचेरी, बडोदें

मुद्रक :—एम्. एन्. कुळकर्णी, कर्नाटक प्रिंटिंग प्रेस,
चिरा बजार, मुंबई नं. २

किती दानें मोठे, कितिक जन ते दर्शनसुखें
किती नामें मोठे, सकल कविला सेव्य कुतुकें.

— साधुदास.

*         *         *

आम्हां घरीं धन शब्दांचींच रत्नें
शब्दांचींच शस्त्रें यत्न करूं.
शब्दचि आमुच्या जीवाचें जीवन
शब्दें वाटूं धन जन-लोकां.
तुका म्हणे पहा शब्दचि हा देव
शब्देंचि गौरव-पूजा करूं.

*         *         *

[ दुसरे सयाजीराव गायकवाड यांचेवरील पोवाड्यांतून. ]

अशा प्रभूचें उमाकान्त कल्याण सदोदित करो
गाइ म्हशी गज तुरंग वहनीं अपार पागा भरो
पुत्र-पौत्रीं राज्य-लक्ष्मी अशीच अक्षइ ठरो
शत्रुपराजय करुनि प्रतापें राज्यनीति आचरो
दान-दक्षिणा-धर्मिं निरन्तर चित्तवृत्ति अनुसरो
गुंग-हैबती शीघ्र कवींची प्रपंच-चिंता हरो.

—प्रभाकर शाहीर

# कवीची भूमिका

"वेशीवर" आणि "समर्पण" ह्या आद्यन्तींच्या प्रकरणांवरून प्रस्तुत कवीची 'वैयक्तिक' भूमिका बहुतांशीं कळून येण्यासारखी आहे.

बडोद्यास एप्रिल, १९३९ मध्यें श्रीमंत प्रतापसिंह महाराज गायकवाड यांच्या राज्यारोहणाचा सोहळा इतका अभूतपूर्व झाला कीं त्यांतील समारंभांची विविधता, विपुलता आणि भव्यता प्रत्यक्ष पाहणारांनाच काय ती आकलन करतां आली असेल. त्या सर्व समारंभांचें यथातथ्य वर्णन करणें माझ्यासारख्या दूरस्थाच्या अल्पमतीच्या आटोक्याबाहेरचें आहे. तथापि हें अल्पमतित्व 'कवीची सर्वसाधारण भूमिका' लक्षांत घेणाराला जाणवणार नाहीं.

वाचक एवढें जाणतात कीं "वृत्तान्त" आणि "काव्य" हीं दोन भिन्नभिन्न क्षेत्रें आहेत/ वृत्तान्ताला गद्यांत यथेच्छ अवसर मिळाला तरी काव्यांत सर्वच वृत्तान्ताला ऐसपैस हात-पाय पसरण्याइतका मुबलक अवसर मिळणें शक्य नाहीं. अखबारनवीस आणि कवि ह्यांच्या भूमिकांत मुळांतच तफावत आहे. अखबारनवीसाला सर्व घडामोडींची तारीखवार, नांवनिशीवार, संगतवार व

तपशीलवार नोन्द करणें परवडतें—नव्हे, तेंच त्याचें काम असतें; तर उलट भावार्थसौन्दर्यांचा आविष्कार करणें हेंच कवीचें कार्य असल्यामुळें त्यानें अखबारनवीसाइतका कांटेकोरपणा केला नाहीं तरी चालण्यासारखें असतें; ज्यांत काव्यगर्भता आढळणार नाहीं त्या प्रसंगांबद्दल कवीच्या वाणीनें मौन धरलें तरी तें क्षम्य होतें; आणि कलापूर्ण माण्डणीसाठीं कांहीं गोष्टी सहेतुकपणें मागें-पुढें करणें त्याला त्याच्या सौन्दर्यसंगोपक दृष्टीनें आवश्यक असतें. वाचक अखबारनवीसाला म्हणतो कीं, काय काय घडलें तें मुख्यत्वें सांग, घडलेल्याच्या मागें काय हेतु किंवा भावना असेल ती आमची आम्ही पाहून घेऊं! उलट, कवीकडून वाचक अशी अपेक्षा करतो कीं, काय काय घडलें तें आम्हाला ठाऊक आहे, पण त्या घडलेल्यांपैकीं कशाच्या पोटीं काय अर्थगर्भता आणि भावगर्भता आहे तेवढी आम्हाला कळायला हवी आहे! रसिक वाचकवर्गाची ही अपेक्षा लक्षांत घेऊनच प्रस्तुत काव्य लिहिलें असल्याचें आढळून येईल. भावगीतांतील एकसंघ भावोद्रेक किंवा काव्यकथेंतील स्वभावपरिपुष्ट घटना यांना प्रस्तुत काव्यांत अर्थातच वाव नाहीं.

राज्यारोहण हा महोत्सव राजा आणि प्रजा ह्या उभयतांच्या चित्तवृत्ती उचंबळून सोडणारा आहे. ह्या महोत्सवांत भिकाऱ्यापासून सर्वाधिकाऱ्यापर्यन्त आणि

C-029

मूढापासून महामहोपाध्यायापर्यन्त सर्वांच्या अन्तर्यामीं भावनेला जोरानें आन्दोलन मिळालेलें असतें. त्याच-प्रमाणें, अभिषेकसमयीं सम्पातकलशांतून पाझरणाऱ्या तीर्थोदकानें राजाचें अंग जितकें थरथरलें असेल त्यापेक्षां कैकपटींनीं चित्त थरथरलेलें असणार. मुगुट धारण कर-तांना मस्तकांत काहूर उठणार नाहीं, हें शक्यच नाहीं. ह्या उभय पक्षीय चित्तवृत्तींच्या कल्लोलांचें प्रतिबिम्ब पडलें तरच तें राज्याभिषेकाचें "काव्य" होईल. मग त्यांत तपशीलाला कांहींसा संक्षेप दिलेला असला किंवा कांहीं प्रसंग गाळले असले तरी "काव्य"-कृतीला गौण-पणा येणार नाहीं. (राजाच्या अन्तर्यामीं उसळणाऱ्या भाव-नोर्मि प्रजेला कळाव्या आणि प्रजेच्या अन्तरङ्गांत घुसळ-णाऱ्या भावनोर्मींचें दर्शन राजाला घडावें अशा तऱ्हेचें पौरोहित्य प्रस्तुत काव्यद्वारां कवीनें बरोबर बजावलें आहे, एवढेंच श्रेय मी वाचकवर्गाकडून अपेक्षितों.)

## विज्ञप्ति

काव्यांतील कांहीं उल्लेखांचें किंबहुना विशिष्ट प्रकरणांचें देखील स्वारस्य समजण्यासाठीं, शेवटीं जोडलेल्या परिशिष्टांतील टीपांकडे नजर टाकावी ही विज्ञप्ति.

कवि यशवन्त यांची

# काव्यसम्पदा

[ प्रकाशित ]

**मित्र-प्रेम रहस्य—**

मित्रनिधनावरील शोक-गीत. किं. ४ आ.

**यशवन्ती—**

प्राथमिक स्फुट-कविता-सङ्ग्रह किं. १० आ.

**यशोधन—**

'इन्दुकला' आणि इतर उत्कृष्ट कविता
यांचा सङ्ग्रह. [ तिसरी आवृत्ति ] किं. १॥ रु.

**भावमन्थन —**

एक सुनीतमाला आणि निवडक
भावगीतें. किं. ८ आ.

**बन्दीशाळा —**

बाल गुन्हेगारांच्या करुण स्थितीवरील
खण्डकाव्य. [ दुसरी आवृत्ति ] किं. १ रु.

**जयमङ्गला —**

विविध भावगीतात्मक हृदयङ्गम
प्रेमकथा. किं. १ रु.

**यशोगन्ध —**

यशोधनासारखाच सरस व भावमधुर
कवितासङ्ग्रह. किं. १ रु.

[ आगामी ]

**यशोनिधि —**

नवीन कवितासङ्ग्रह : लवकरच प्रसिद्ध होईल.

## काव्य-किरीट

# मणि-मोती


१. कवीची भूमिका ( गद्य )

२. वेशीवर ( प्रास्ताविक पद्य ) ... ... ... ९

३. सान्त्वन-सन्देश ... ... ... ... ११

४. तीर्थांस आवाहन ... ... ... ... २९

५. पूर्व सिद्धता ... ... ... ... ... ३७

६. सामुदायिक प्रार्थना ... ... ... ... ४४

७. हुद्दे पूजन ... ... ... ... ... ५१

८. राज्याभिषेक ( वेदोक्त विधी ) ... ... ६०

९. राज्यारोहण ( गादीवर आरोहण ) ... ... ६७

१०. कैद्यांची मुक्तता ... ... ... ... ७७

११. अन्नसन्तर्पण व शिष्टसम्भावना ... ... ८३

१२. देवदर्शनाची स्वारी ... ... ... ... ९३

१३. कीर्तिमन्दिराच्या गाभाऱ्यांत ... ... ९६

१४. जीन घर, जीन तख्त ... ... ... १०१

१५. भाव-भेटीचा सोहळा ... ... ... १०७

१६. धनी - नि - चाकर ... ... ... ... ११४

१७. अनुरञ्जन ... ... ... ... ... ११९

१८. रोषनाई ... ... ... ... ... १३४

१९. आतषबाजी ... ... ... ... ... १३६

२०. भविष्य-दर्शन ... ... ... ... १३७

२१. काव्य-समर्पण ... ... ... ... १४९

२२. परिशिष्ट — टीपा ... ... ... ... १५२

# वेशीवर

[ जाति—चन्द्रकला ]


नांवारूपाचें माझिया जिथें प्रथम पीस
विराजलें शीर्षीं हीच त्या नगरीची वेस.
यशोमन्दिराची पायरी मज पहिली-वहिली
चढावयाची ह्या सुसन्धी नगरीनें दिधली
इथेंच कीं माझ्या रांगड्या वाणीचीं गाणीं
डोलविल्या माना कौतुकें ऐकुनि रसिकांनीं
राजकवी होते सुधेची पकवित जिथ हण्डी
ह्या पदरामधली माझिया तिथेंच पुरचुण्डी
उघडुनि पोह्यांच्या मारितो कोण फक्या, बोला ?
अहो, नवल हें कीं जाहले रसज्ञ परि गोळा !
कळण्या – कोण्ड्याची शिदोरी, लाज जिची मजला,
तीहि आग्रहानें लाविली परि खोलायाला
आणि आवडीनें घेतले घासावर घास
वृद्धिङ्गत व्हाया अन्तरीं विश्वासोल्हास
अशा गुणज्ञांची आणखी उदार-शीलांची
तीच हीच नगरी – अवन्ती, कीं काशी, काञ्ची ! १६

'गुऱ्हाळांत' अपुल्या आणि जे पिळती 'एरण्ड'
माधुर्यापुढती जयाच्या फिका इक्षुदण्ड
मज बन्धूसम ते नान्दती इथें 'चिमणराव'
'चऱ्हाटास' ज्यांच्या रेशमाहुनी रङ्ग भाव
आणि तयासङ्गें 'रेशमी चिमटे' घेण्यांत
कुशल लेखणीचे सुहृद हे इथें 'राजरत्न'
कैक रसज्ञांनीं अशी ही शोभिवन्त नगरी
राजघराणें कीं पाहते स्वबिम्ब ह्या मुकुरीं.
कारण मम पोहे नेउनी राजमहालांत
जिनें गौरवीला सुदामा ती राज्ञी येथ
"न्ह्यारीचें गाणें' जयांचें ते हे कवि अमुचे"
ह्या राज्ञी-वचनीं लाभलें नृपतिपरिचयाचें—
भाग्य जिथें मजला तीच ही थोर राजधानी
जिच्या गोड ऐशा मानसीं कितीक सांठवणी.
आणि भविष्याची पालवी फुटावया भव्य
तरारली वाटे आज जी त्यजुनि जीर्ण काय
तीच हीच नगरी पसरली थोर राजधानी
भव्य-हेतुगर्भा जीमधें नवी आमदानी—
सुरू जाहलीसे साधुनी मङ्गल सुमुहूर्त
कवन तिचें गाया अन्तरीं हो प्रतिभे स्फूर्त. ३६

# सान्त्वन-

# सन्देश

उदण्ड राज्य करो अम्हांवर हा राजा अमुचा



तो भगवा झेंडा 'मांडवी'वरी डोलणारा

# सान्त्वन-सन्देश

[ जाति—**चन्द्रकला** ]

ध्वज भगवा लक्ष्मीविलासावर फडफडणारा
तसाच हा इकडे माण्डवीवरी डोलणारा
गायकवाडांची प्रभातीं भूपाळी स्तवितो
गायकवाडांची आरती सायन्तनिं करतो
गायकवाडांचे पवाडे दिन-रजनी गातो
गायकवाडांचा दरारा दिगन्तरीं नेतो
गायकवाडांच्या स्तुतीच्या रम्य भव्य गोष्टी
गोड घास जणुं ते भरवितो वायूच्या ओष्ठीं
सेवुनिया त्यांना प्रमोदें नाचत वायु सुटे
पदन्यास सहजीं तयाचा जनान्तरीं उमटे
गायकवाडांचा तयावर तळपे इतिहास
निरक्षरासहि तो न यावा का वाचायास
गायकवाडांच्या देत तो शौर्याच्या साक्षी
जागवि जन कथुनी किती तरि ते महदाकांक्षी
गायकवाडांचा तयावर तळपे इतिहास
स्फुरवी जनतेच्या मानसीं ईर्षा उल्हास. १६

तो भगवा झेण्डा माण्डवीवरी डोलणारा,
तो हा ध्वज लक्ष्मीविलासावरी विहरणारा,
कां एकाएकी जाहला अधोवदन आज ?
केवि दिमाखाचा तयाच्या कोसळला ताज ?
का तत्सङ्गीता अचानक लागेना सूर ?
काळवण्डला का तयाचा क्षणार्धांत नूर ?
म्लानमुखी झाली तेंवि का सकल राजधानी ?
का विव्हल झाली कुणाच्या खर शरसन्धानीं ?
पुढें ठेवियेली वाढुनी काय अमङ्गलता ?
अवलोकीं जनता सभोंती विस्मय-भय-चकिता.
तों धडके वार्ता 'सयाजी महाराज गेले' !
नव्हेच वार्ता ती, मस्तकीं वज्रच कोसळलें
ती वार्ता कसली, विजेचा दाहक कीं लोळ
रिघून जन-कर्णीं अन्तरीं करी जाळपोळ
कीं ज्वालामुखिचा अचानक झालासे स्फोट
हादरुनी गेली जयानें घरें, पुरें, कोट !
हादरली तेणें न केवळ ओखा, नवसारी,
कडी नि अमरेळी: न केवळ सीमा या चारी;
आसेतुहिमाद्री हादरे भरतखण्ड सारा
सुटला या जेव्हां अमंगल वार्तेचा वारा !
काय कथूं मग त्या प्रजेच्या दुक्खाची सीमा ?
ढासळेल ऐशा प्रसंगीं स्वभावगिरि धीमा ! ३८

" जंगलांत कुठलें सुरक्षित जीवित वा वित्त "
– जरि न मुखीं – वदलें ह्यापरी अवघ्यांचें चित्त
अशा एक काळीं जनान्तरिं अविश्वास सारा
असतांना धैर्यें ठाकला गभीर सामोरा,
आणि जंगलाचें मनोहर बनवुनि उद्यान
एकमेव झाला प्रजेचें विश्वास-स्थान.
नृपतिपदीं ज्याची न होती विभवसुखासक्ती
" जनहितरत " म्हणुनी सर्वदा विराजला तख्तीं
तो राजा जाता उडाला हाहाहाःकार
मनांत सकलांच्या कोन्दला गहन अंधकार
हातांतिल कामें थबकलीं, सुचे न कांहिं कुणा
स्तनंध्येय शिशुही विसरले मातृस्तनपाना
घरीं आणि दारीं आणखी चौकाचौकांत
मूक कुठें, कोठें व्यक्त तो होई आकान्तः— ५२

[ जाति—**कव्वाली** ]

अवान्तर अडगळ प्राणी असतां
आमुचा नेसी भाग्यविधाता
कोपलास कैसा असा म्हाळसाकान्ता !

आमुचा साधी नित उत्कर्ष
तयाविण ठावा अन्य न हर्ष
जीवितीं निघे हा एकमेव निष्कर्ष

धुण्डुनी कणकण चोचीमधुनी
आणुनी भरवि पिलांच्या वदनीं
हा विहगकोटिंतिल मायपणा पाहोनी —

हिण्डला पञ्च खण्ड जगतांत
सेव्य जें आलें दृष्टिपथांत
तें टिपुनि खण्डणी देइ जनां सम्राट

वसे जरि देहें लक्ष्मिविलासीं
रमे परि बुद्धीच्याच विलासीं
हा उदारमति आदरी कलाकुशलांसी

तयातें व्यसनें विज्ञानाचीं
चढे ज्या धुन्दी कर्तव्याची
वासना निरन्तर एकच पुरुषार्थाची

आपुल्या अवघ्या आधीव्याधी
विसरुनी निज कर्तव्यामोदीं
म्हणवि तो "प्रजेचा मी तर पहिला बन्दी"

गुणांना रत्नाकरही लाजे
दिगन्तीं डंका संतत गाजे
आदर्श तया मानिती इतर अधिराजे

राइचे केले किति पर्वत
रजाचे केले ऐरावत
हा गुणज्ञ झाला भोज विक्रमादित्य

असा हा स्पर्शमणी विनतांना
तेवि हा चिन्तामणि दीनांना
गुणगणीं कण्ठमणि अखिल रावरंकांना

प्रतापी प्रौढ असा राजर्षी
दीपगृह जणु ध्येयपथदर्शी
चन्द्रमा जाय हा अस्ता अमृतवर्षी ! ८५

[ जाति—**चन्द्रकला** ]

हळहळला नाहीं असा नच आढळला प्राणी
राजघराण्याची कोठवर वर्णावी हानी ! ८७

" ओढवलीं जेव्हां संकटें एकावर एक
सुतनिधना-सम तीं [-अग्निचे जणुं ते अभिषेक
दुर्दैवें केलें -] तेधवां संयमशील मनें
स्वता साहुनीया जाहले त्या निज आचरणें —
सान्त्वनपर इतरां असे जे संसारामधले
जोडीदार खरे; अगोदर परि कैंचे गेले ?
प्रवाहांत पायाखालची वाळू सरकावी
क्षणोक्षणीं भीती ' कशी निज धडगत लागावी '
जीवितांत ऐशा जिवाचे एकच आधार
अर्धशताधिक जे वत्सरीं सहचर साचार
केली परि त्यांनीं अगोदर जायाची घाई "
विलाप करि राज्ञी ह्यापरी श्री चिमणाबाई ९९

विशेष शोकभरें बोलती श्रीमद् युवराज
" प्रतापसिंह खरा पोरका झाला हो आज
मातापितरांचा न मातें वियोग जाणवला
वात्सल्यें इतुक्या उबारा मज ज्यांनीं दिधला
विशेष परि हें कीं न केवळ पुरवियली छाया
( पितामहालागीं जिव्हाळा नलगे शिकवाया !
स्वभावेंच्च अपुल्या दाविली मजवर जरि माया )
भव्य भविष्याचा माझिया घातलाहि पाया.

मत्कल्याणाची वाहुनी चिंता दिनरजनी,
जबाबदारीचे द्यावया ज्ञान मला करुनी,
पाठराखणी ही जयांनीं सावधान केली,
मार्गदर्शकाची भूमिका ज्यांनीं पत्करली,
साक्षात् मज होते असे जे वसिष्ठ वा व्यास
अंतरलों आजी हाय मी त्या गुरुवर्यास!" ११२

असे परोपरिंनीं सयाजी-भूपति-गुण-रूप
आठवितो जो तो तयांचे तसेच साक्षेप.
शोकानें अवघे जाहले हवालदील जन
गाढ भाव ऐसा प्रजेचा नृपति-पदीं बघुन
दुक्ख उणें वाटे आपुलें प्रतापसिंहातें?
होणें गाय कसें प्रसंगीं रुचेल सिंहातें!—
"समय बिकट येवो कितीही समोर निकराचा
उपाय शोधाया पवित्रा बहु चातुर्याचा
घेत सदा आले पितामह, पौत्र तयांचा मी
तच्चारित्र्याची घेउनी शिकवण ही नामी
कुंठितमति व्हावें काय तरि बुडून शोकतमीं
पूज्य पितामह ते, गुरू ते, जातां निजधामीं?
रुचेल ना त्यांना पाहुनी मज शोकव्यास.
शिकवण आचरणें हेंच कीं कर्तव्य प्राप्त.

बाणा चालवणें आपल्या वंद्य पूर्वजांचा
एकमेव लोकीं धर्म हा असे वंशजाञ्चा.
शिकवण अनुसरणें गुरूची, पुण्यश्लोकाञ्ची,
कृतज्ञता तैशी थोरवी त्यांतच शिष्याची.
म्हणून या समयीं ठाकलों जर उन्नत शीर्ष
तरी मृतात्म्यातें लाभणें मुक्ति नि सन्तोष."
अशा विचारोर्मी दाटल्या प्रतापसिंह-मनीं
आणि धीर द्याया प्रजेला प्रगटे वीरमणी. १३५

## सन्देश ( गीति )

माझ्या प्रजाजनांनो !
दैवें केली अवकृपा घोर
हारपला नृपसत्तम !
हानी भरुनी कधीं न येणार

आताहुनि आत तुम्हां
वत्सल तैसाच जन्मदेपरिस
काञ्चनयुगनिर्माता
नेला उचलून मृत्युनें परिस

शोक तयास्तव तुमचा —
        नोव्हे हा शोक, राजभक्ती ही
आह्मां राजकुटुम्बी —
        जनांसही धीर संप्रती देई.

अपुली हीच अनन्या
        निष्ठा स्फूर्तिप्रदा मला व्हावी
ह्यावाचुनी दुजी मी
        करुणा देवास काय भाकावी ?

माझे पूज्य पितामह
        खपले आजन्म या जनांसाठीं
त्यांच्या चारित्र्याची
        होइल मज मार्गदर्शक ज्योती. १५५

*        *        *

आपण ज्या नृपतीच्या
        हानीस्तव आज सर्व हळहळतो
होता शेतकऱ्यांची
        वाहत संतत मनांत कळकळ तो.

" ग्रामपुनर्घटनानिधि "
ज्याचा " खेती विकास " उद्देश
हीरकमहोत्सवीं निज
निर्मी तो, त्यास साक्ष हा देश.

'कल्याण खेडुतांचें '
एकच चित्तास त्याचिया ध्यास
जागेपणीं न केवळ
मृत्यूशय्येवरीहि ती प्यास

चारित्र्यांत तयाच्या
जैसें हें ज्ञात जाहलें मजला
गत-दश-वर्षानुभवीं
आलें प्रत्यक्ष तेंच नजरेला

ते माझ्या राज्याचे
आधारस्तम्भ सर्व खेडूत
नांदावेत निरन्तर
सुखीं समाधानपूर्ण वृत्तींत

जाहीर तरी करितों
सांप्रतचा जो जमीन-महसूल

केला कमी इथोनी
        किसान-जनतेस पूर्ण अनुकूल १७९

*                *                *

तैसेंच जाणतों मी
        शासन-संस्था नसेचि निर्दोष
शास्ता शासित यांचे
        प्रेमें फुलतिल जरी न हृत्कोष
शास्त्यास शासितांच्या
        आकांक्षा जरि खुल्या मनें कळती
एकाच्या दुक्खाची
        येई अन्याप्रती तरी कळ ती
शास्ता शासित यांतिल
        साधाया एकरूपता खास
धारा-सभेंत येइल
        लोकमतातें विशाल अवकाश
ऐशा सुधारणेची
        देतो जन हो सहर्ष मी ग्वाही
व्हावें राज्य बडोदें
        इतरां आदर्श एक ईर्षा ही. १९५

*                *                *

आप्त-स्वकीय तैसे
ऐका आसामदार सरदार
अपुलें हित साधाया
केव्हांही मी नसेन अनुदार

व्हावें नव्या युगाला
स्वागततत्पर इनामदारांनीं
“ नाहीं दैवत जनता —
जनार्दनावीण ” आणुनी ध्यानीं २०३

* * *

तैसेंच आयका हो,
सुवर्णयुगतुल्य आमदानी जी
झाली, त्या नृपतीची
स्मृती जनांना रहावया ताजी

कांहीं कितीहि केलें
तरि तें थोडेंच खास ठरणार
तरिहि यथामति करितों
स्मारक-संकल्प आज जाहीर

काढून कोटि रुपये
ठेवित मी खाजगीतुनी अलग
कार्यार्थ सामुदायिक
सकलां होइल तदीय उपयोग ! २१५

*   *   *

मंत्रच पितामहांचा
"अग्रेसर भृत्य मी प्रजानिष्ठ"
राहिल शासन-कर्मी
उज्ज्वल माझेंहि तेंच उद्दिष्ट

आणि शेवटीं आतां
प्रभुचरणीं एक मागतों दान
दीर्घ निरामय जीवन
देइ जनां, करि अलोट कल्याण ! २२३

अर्थगर्भ ऐसा नृपाचा ऐकुनि सन्देश
दिलासाच मानी तदा तो शोकतप्त देश.
आणि विकलतेचें तयाच्या विरुं लागे पटल
सूर्योदयिं लागे व्हावया धुकें जसें विरल.

आणि अन्तरंगीं दाटुनी प्रेमाचें भरतें
धन्यवाद देई प्रजा श्री प्रतापसिंहातें.
आणि ठायिंठायीं जनांच्या संमर्दामधुनी
जयजयकार उठे, तयांतिल बोल घ्यान्न टिपुनी—
"जयजयकार महाराज श्री प्रतापसिंहांचा!
उदण्ड राज्य करो अम्हांवर हा राजा अमुचा!"
जयजयकाराचें ऐकुनी काय हेंच बोल
हा भगवा झेण्डा हलूहलुं धरूं लागे डोल.
तोहि साथ देई प्रतिनिधी गायकवाडांचा—
"उदण्ड राज्य करो अम्हांवर हा राजा अमुचा!" २३७

# राज्याभिषेक

प्रजासुखे सुखं राज्ञः प्रजानां च हिते हितम्
नात्मप्रियं हितं राज्ञः प्रजानां तु प्रियं हितम्

# तीर्थांस आवाहन

[ जाति–**समुदितमदना** ]

आकाशाच्या विशाल तबकामाजी तेजोगुणी
नक्षत्रांच्या दिव्य मंगलाक्षता उभी घेउनी
कोण असावी सुहासिनी ही धवलाम्बरधारिणी
स्वागतशीला कुणा आळवी भूपाळी गाउनी ?
ही तर दिसते 'विश्वामित्री' अनामिका-रूपिणी
परि उत्साहें हृदय होतसे विशाल उदधीहुनी !
पिढीपिढीला एकदांच जी उद्भवते पर्वणी
ती साधाया समुत्सुका ती आज उभी अङ्गणीं.
कार्य तियेच्या घरीं निघालें अनन्य-साधारण
म्हणुनि भारतामधील तीर्थांपगांस पाचारण
करावयाला सिद्ध जाहली शुचिर्भूत होउनी
भल्या पहाटे मुदित-मानसा भूपाळी गाउनी.
ती भूपाळी — आवाहन तें अवघ्या तीर्थांप्रती
सर्व तनूचें कान करोनी श्रवते राजन्वती :—   १४

[ भूपाळी ]

मंगल राज्याभिषेक मंगल कार्य घरीं माझिया
निघालें कार्य घरीं माझिया
म्हणुनि सयांनो, तुम्हांस आले आमन्त्रण द्यावया.
विश्वामित्री दीन केवला भगिनी जरि सानुली
आपुली भगिनी जरि सानुली
कृतार्थ तिजला करा आपुल्या सिञ्चुनि तुहिनावली.
ये मराठियांच्या माते । ये वत्सल कृष्णामाई
ये समर्थांचिया दूती । ये सखये कृष्णामाई
वारणा-कोयना-भीमा- । वेण्यादि सख्यांसह येई
तव जलांतल्या वीर्यानें । थाटली थोर शिवशाही
हें राज्यहि गायकवाडी । शिवशाहिचीच पुण्याई
ध्वज भगवा शिवशाहीचा । साक्ष तीच सांगत राही
गायकवाडी रियासतीमधिं पान उघडतें नवें
आजला पान उघडतें नवें
म्हणुनि तुवां हें सये साजिरें कार्य कराया हवें. २९

[ २ ]

मुळा-मुठांनो, प्रीत कीर्त या गात पेशवाइची
तडित्सम हिंदुपातशाहिची
तैंवि जाग भारता देइ त्या लोकमान्य विभुतिची

विजयनगरच्या साम्राज्याची पताकाच फडकती
उर्वरित पताकाच फडकती
‘वेदांची धात्री’ च म्हणोनी ख्यात तशी भारतीं—
ती तू तुङ्गा, तशीच भद्रा :—परस्परालिंगनीं
होतसा मुदें एकरूपिणी
तुम्हां बाहते करावयातें संस्कृतिची राखणी.
ये दक्षिण-गंगे गोदे। घेउनी पताका दिण्ड्या
ये रामचन्द्र-सीतेच्या। घेउनी कथामृत-हण्ड्या
त्या प्राणहितादि नद्यांच्या। भरभरुनि आण कासण्ड्या
नजराण्यास्तव काशतृणाचे धवल फेनसम तुरे
घेउनी हिऱ्यासारखे तुरे
येउनि माझ्या गेहीं, मङ्गल कार्य करी साजिरें. ४४

## [ ३ ]

‘इथेंच आहे, इथेंच आहे, इथेंच आहे खरा
स्वर्ग ह्या वसुन्धरेवरि खरा’
जिच्या उगम पाहुनी प्रगटली जहांगिराची गिरा
अशी मूर्त सौन्दर्य-देवता जीच्या तीरावरी
नान्दते अवतरुनी भूवरी

मराठी ग्रं
सं.
ता.

आत्मविसर्जन करावयातें जिच्या बाहती दरी
मदालसा सुखविलासिनी जी ठायींठायीं पथीं
विसावा घेत घेत जाइ ती
मार्गी तिचिया अशीं पसरलीं सरोवरें तरि किती
बिजवाऱ्याचें देवालय तें परचक्रापासुनी
रक्षिलें चातुरीच लढवुनी
तिच्या गुदगुल्या अजुनि उसळती जीच्या लहरींतुनी
गत संस्कृतिच्या विभवाच्या । चिन्तनीं सन्थ कधिं जाई
तटवासि कलावन्तांना । स्फूर्तिदायि जी नित होई
पावलोपावलीं तैशी । जी थबकुन मुरडुन पाही
श्रीनगरांतिल निर्माल्यालङ्कृती मुदें मिरविते
'वितस्ता' स्वनाम जी सांगते
अये स्वर्धुनी ! तुजविण कां मम कार्य यथासांग तें. ६२

[ ४ ]

ये ये सिन्धू, प्रभूतसलिला वेगवती तूं खरी
सर्वथा भारतीय तूं खरी
परोपनिसदी-पारसिकांच्या भुलसि यशा क्षण जरी.
इतिहास सांगती तूतें । काबूल आणि ती स्वात
ह्या चिनाब सतलज रावी । ह्या बियास झेलम मत्त

अर्पिलें अशा कितिकांनीं। तरि तुझिया चरणीं स्वत्व
तैशीच ब्रह्मपुत्रा ती। तव भगिनी तुल्य गुणांत
परन्तु मानससरोवराच्या दुहितांनो गा तुम्ही
होतसा विरहानें का श्रमी ?
भेटिसुखाची पर्वणीच, या, साधा मम आश्रमीं. ७२

[ ५ ]

गङ्गामाई ! आर्यावर्ता तूं तर मातामहा
गाजसी तूं तर मातामहा
त्वज्जल-मज्जन घडो अन्तरीं सकलांच्या ही स्पृहा
मुरलिधराची मूर्ती चिन्तित वृन्दावन-विहरिणी
पातली कालिन्दी वाहिनी
रामराज्यगुण गात येतसे शरयू ही इकडुनी
नीला, ब्रह्मा कितीक गङ्गा तुझिया आलिङ्गनीं
सुखावति तुझिया आलिङ्गनीं
आणि गण्डकीसम सरिता किति देती तुज खण्डणी
व्यास वाल्मिकी भारतभूषण कविवर्यांची गिरा
प्रस्फुरे कविवर्यांची गिरा
प्रसाद तव ते — भजन तुलसिचें, कबिराचा दोहरा.

किति बलाढ्य राजवटींचे । ऐकिले तुवां पोवाडे
दूरदूरच्या योद्ध्यांचे । तव पात्रीं न्हाले घोडे
जन्ममृत्युचे कितिकांनीं । तव तटीं चुकविले खोडे
होतात खुलीं मोक्षाचीं । तव तीरावरति कवाडें
अगाध-तीर्थापगा अशी तूं अगणितगुणशालिनी
अशी तूं अगणितगुणशालिनी
तरि करि मङ्गल कार्य साजिरें मम गेहीं येउनी. ९१

## [ ६ ]

आणि नर्मदे, अमरकण्टकापासुनि तूं धावसी
गिरिदरी घुमवित तूं धावसी
तुझिया तीरीं क्षेत्रें साक्षात् काशी वाराणसी
हिन्ददेविकटिवरी मेखला रुचिर अशी तव कमा
त्वज्जलीं नीलमण्यांची कमा
प्रस्तर काठावरिल दाविती दिव्य यशोधवलिमा
तव पात्रांतिल बाण पावले घरोघरीं प्रभुपदा
वारिती भक्तांच्या आपदा
तुझ्याच गेहीं तुला बाहते – खुळी न कां मी वदा !
ये साबरमति घेवोनी । त्या मुनिच्या आशीर्वचना
मिन्दोल, अम्बिका, तापी । धातूर, मही अन् पूर्णा

तुमचीच वडिलकी, मी तों। आपुली प्रतिनिधी जाणा
फल्गू, ऐरावती, पिनाकिनि, कावेरी, चम्बला,
तुम्हीही तीर्थरूपिणी; चला—
कार्य साजिरें करा गृहीं मम सिञ्चुनि मङ्गल जला. १०६

## [७]

सखे सरस्वति, पहा हिणविती मजला सगळ्याजणी
गुप्त तूं असती कधिंपासुनी—
'कीं हे श्रीचे उत्सव रुचति न तुजसि मनापासुनी'
परि कुठें तयांना ठावें। सम्पदा विसरली वैर
म्हणुनिया सरस्वति तीच्या। बागडते सदनीं स्वैर
हें सख्य-सकल पुण्याई। गत कारकीर्दिची थोर
होतिल सगळ्या फजीत विस्मित मात्र पाहुनी तुला
लक्ष्मिच्या गळ्यांत घालुनि गळा
इथें विहरता, अहा अलौकिक म्हणतिल हा सोहळा!
मङ्गल राज्याभिषेक, मङ्गल कार्य घरीं माझिया
निघालें कार्य घरीं माझिया
म्हणुनी सहपरिवार सयांनो, निमंत्रिते यावया. ११८

श्रवुनी विश्वामित्रीचें हें पाचारण आदरें
तीर्थवाहिनी भारतवर्षामधल्या सजल्या त्वरें
तिच्या घराला – वटोदरा नगरीस यावया मुदें
कणांकणांतुनि वितराया शुभ मङ्गल कार्यामधें.
अहो, न केवळ तीर्थवाहिनी आल्या एकेकल्या,
केवि तत्पती अलग राहतिल ठायीं आपापल्या !
दिशादिशांतुनि वारिराशिही आले कलशांतुनी
करायास गुर्जराधिपा अभिसिञ्चन सिंहासनीं.
पाहुनि येती चोंहिकडोनी अनन्त तीर्थोदकें
म्हणे राज्यभू ‘पूर्वपुण्य सौभाग्य आज हें पिकें’.
स्वागतार्थ त्यांचिया लागलीं वाद्यें गर्जावया
लोक लागले नाचाया निज विसरुन पदव्या वया. १३०

# पूर्व सिद्धता


[ वृत्त–**मरीचिका व कलावती**-मिश्र ]

निमंत्रिलीं नच तीर्थोदकेंच केवल तीं
अनेक राजसमीती निमंत्रणा निघती.
कितीक राजघराणीं स्वकीयसंबंधीं,
कितीक मानकरी आप्त, भक्तिचे बन्दी,
कुणी वडील, हितैषी, कुणी सखे सुरुची,
करी तयां नृप आमंत्रणें स्वदस्तुरचीं. ६

तसेच्च गायकवाडी कृपाजलें सृजले
कितीतरी जन ऐसे मनांत उत्सुकले.
असे कलाप्रिय विख्यात गुर्जराधिपती
म्हणोन कैक कलावन्त भारतीं जगती.
कितीक शिक्षणसंस्था स्थिरावल्या दिसती
उदार गुर्जरभूपाश्रयामुळें भंवतीं.
गुणासही विकसाया हवा नृपाश्रय तो ✓
नृपाश्रयाविण उद्योग कैकदा फसतो
ऋणी गुणी जन उद्योगशील कैक असे
मनीं तृषार्त न होतील केवि चातकसे !

अशा समस्त जनांनीं निमंत्रितांसह ती
क्षणीं दुणावुन गेली वटोदरा-वसती.
मुलास देखुनि पान्हा स्तनांत दाटतसे,
वटोदरा-नगरीचे उरोज होति तसे.
नृपाप्रती म्हणती ‘ नाथ ’ लौकिकांत जरी
नृपास नूतन, राजन्वतीच माय परि.
नवीन भूपति सिंहासनीं विराजतसे
पुरीचिया स्तनिं पान्हा म्हणून दाटतसे. २४

पहा कुठेंहि कुणाच्याहि आननीं नयनीं
प्रसन्नताच पुरेपूर यायची दिसुनी.
सबाह्य आन्तर सारे गृहांस रंगविती
निजान्तरेंच करायास काय बिंबित तीं.
उभ्या घरोघर केल्या गुढ्याहि पौरजनीं
तदीय डोलति आशाच त्या जणों गगनीं !
करून गोमय सम्मार्जनें घरांपुढतीं
चितारिती विविधा रंग-वल्लिका युवती.
“ प्रतापसिंह करो राज्य हे प्रभो सुयशें ”
अशीच अक्षरपंक्ती तिच्यांतुनी विलसे.
कुणी करून फुलांच्याच टांगल्या माळा
शतायु चिंतियलें ज्यांमधून भूपाळा.



लक्ष्मीविलास राजवाड्याचें महाद्वार

मुलें मुली निज छन्दांत नाचती डुलती
प्रशस्ति-गीति रचोनी स्वयें नृपावरती.
प्रदर्शनेंच अशीं गाढ राजनिष्ठेचीं
प्रजा पदोपदिं माण्डून ठेवि कीं साचीं.
जिथें तिथें दिसुनी येइ भूपति-प्रतिमा
पडे तसा श्रवणीं राज्य-लक्ष्मिचा महिमा. ४२

[ जाति—**चन्द्रकान्त** ]

आणि राजलक्ष्मीच वावरे ज्यांत मूर्तिमन्त
बडोद्यांत किति विराजती प्रासाद नामवन्त.
'मकरपुरा' हा, 'नजरबाग' ही, महाल 'इन्दुमती'
विशेष 'लक्ष्मीविलास' करितो नामावलिपूर्ती.
'विलास' अवघे, 'महाल' सारे, तशा सकल 'बागा'
गजबजल्या पाहुणे जनांनीं; आणि खुल्या जागा —
व्याप्त जाहल्या उभारलेल्या तंबु-राहुट्यांनीं
मेहमान लोटून राहिले चोंहि दिशांकडुनी. ५०

प्रमुख पथांवर अहो दुतर्फा स्तम्भ रोवियेले
अशोक-पल्लव कुणां, कुणां तर लपेटले शेले.
सकलांवरि लोंबलीं तोरणें रंगी-बेरंगी
करी खुषामत वायु तयांची तन्नर्तन-रंगीं.

लोकमनीं ज्या उमटत होत्या मोदाच्या लहरी
त्याच थरकल्या काय तोरणांतुन अष्टौप्रहरीं.
स्तम्भास्तम्भावरी तसे ध्वज सहर्ष फडफडले
आणि झळकले गायकवाडी त्यांत बिरुद-बिल्ले
चौक सुशोभित उभारलेल्या भव्य कमानींनीं
नृपाभिनन्दन सुवर्णाक्षरीं झळके ज्यांमधुनी.
लोक विहरती, स्वार दौडती, तैंवि वेगवान
अमित वाहनांतून धावती थोर मेहमान.
उत्सवांत परि विरजण कणही पडूं नये म्हणुन
कदमाकदमावरी शिपाई खडे सावधान. ६४

आनन्दाचा असा राहिला भरून जो पूर
द्विगुणित झाला घुमूं लागता वाद्यांचा सूर. ६६

* * *

प्रथम मंगलाचरण गायिलें सनयांनीं गोड
झडुं लागति चौघडे नगारे आणि धाडधाड.
विलायती रणतुरे व्यापिती नभ आलापांनीं
सुचविति उत्सव सुरूं होतसे कीं धार्मिक विधिंनीं. ७०

येति उभयता खाशा स्वाऱ्या मांगलिक स्नाना
आपआपुल्या कामीं जो तो मग्न कारखाना.

जव्हेरखाना धाडुनि देई चान्दीचीं भाण्डीं
घंगाळें, चौरंग, तपेल्या, हण्डे, कासण्डी.
शागीर्दादिक रुची जाणुनी घेउनि खाशांच्या
सज्ज ठेविती घड्या पिताम्बर-शालू-शेल्यांच्या.
सुसूत्र सारी जरी व्यवस्था तरी उडे घाई
घाई देखिल मंगल समयीं हो शोभादायी.
कुणी उपसुनी भरभर काढी तें आधण-पाणी
पाण्यावरती नृत्य माण्डिलें नीरव वाफांनीं.
त्या वाफांचे जलकण जमले स्नानगृहामाजी
आणि जहाली तक्तपोषिही स्नेहार्द्रा आजी.
अहो, नव्हे ती तक्तपोषिला जलसीकरपंक्ती;
तक्तपोषिच्या अलंकृतींतिल शोभति मणिमोती.
दास–दासिंनीं स्नान घातलें नृपास राज्ञीस;
तक्तपोषिनें तेंवि सिंचिले वरून बिन्दूंस.
पडति गवाक्षांतुनि बाहेरी सुगंधमय वाफा
बघताक्षणिं त्या गर्जू लागे वाद्यांचा ताफा.
पण्डित-शास्त्री-पुराणिकांना सूचनाच जणुं ती
पुढील वैदिक सकल विधींच्या तयारीस सजती. १०

करिति ‘ विनायक-शान्ती ’ ‘ ग्रहमख ’ राजोपाध्याय
अनिष्ट ग्रह-जप दानें, पूर्णाहुति, धर्मादाय.

येति उत्तराभिषेकसमयीं नृप राज्ञी संगें
पावन त्यांचीं मन्त्र-जलानें होति उत्तमांगें.
तशीच दुसऱ्या दिनीं पुरोहित करि " ऐन्द्री शान्ती "
शान्तिपाठ ते मन्त्रघोष ते " स्वस्ति श्री " म्हणती.
नृपकान्ता सौभाग्ययुता ती " श्रीशान्तादेवी "
तिच्या स्वरूपीं शान्तिदेवता प्रासादा सेवी
अशी सुभगसम्पदाच असता राज्ञी रायाची
काय जरूरी वैदिक ' शान्ती ' आदि उपायांची ?
हाच भाव जरि खेळत राही जनहृत्कासारीं
परि 'अधिकस्याधिकम् फलम्' हा न्यायच व्यवहारीं ! १०२

सुदिन उगवला; गणेशपूजा करिति राजजोशी
स्तविति " गणेशा, वाराया तूं शक्त अशिवतेसी.
कालनियन्ता तूंच, ब्रह्मणस्पति, विश्वाधार,
ऋद्धिसिद्धिचा नायक तो तूं रूपीं ओंकार,
असति तूंच कीं मुळारम्भ आरंभ निर्गुणाचा,
पंचमहाभूतेंहि तूंच गा, चतुर्विधा वाचा.
कृपाप्रसादें तुझ्याच मङ्गल समारम्भ-सिद्धी
तुझ्या कृपेनें ऐश्वर्याची विजयाची वृद्धि. "
अशीच पूजा प्रशस्ति झाली वरुणदेवतेची
तदनन्तर जाहली स्थापना घटिकापात्राची. ११२

वडील आप्त-स्वकीयांप्रती अभिवादन करुनी
श्रीभोगेश्वर पञ्चायतना विनम्र होवोनी
बसती पुण्याहवाचनातें नृप राज्ञीसहित
धरुनि भाव " करु निरलसतेनें विधि जे जे विहित. "
" गङ्गोत्पत्ती, गङ्गापूजन – तिथिविशेष आज
भगीरथासम घडावयाचें भव्य कामकाज
हाच आजच्या सुमुहूर्ताचा गर्भित सन्देश "
निवेदिती पुण्याहवाचनीं शास्त्री खाशांस.
आणि उरकुनी घेति पत्रिकापूजन नृपहस्तें
कीं सन्तत सन्तुष्ट रहाया ग्रह भविष्यशास्तें.

ग्रं
क्र.
सं.
ता.

गांवोगांवच्या

# सामुदायिक प्रार्थना

[ जाति—**चन्द्रकला** ]

दिन आनन्दाचा उगवला ! गादीवर आज
विराजमान अहो व्हायचे श्री प्रतापराज.
गांवोगांव, तसा घरोघर, अवघ्या राज्यांत,
हर्षोत्फुल्ल मनें लागला नाचाया वात.
गुढ्या-तोरणांनीं मन्दिरें मार्ग शोभिवन्त
करावया सजलें बडोदें-राज्य अविश्रान्त.
जयजयकारांनीं त्यांसवें मंगलवाद्यांनीं
तारामण्डळही भूसवें गेलें दुमदुमुनी.
आणि लोकवस्ती सोडुनी जाल जरी दूर
येतिलही कानीं काननीं हर्षगीत-सूर.

आढळेल कोठें प्रमोदें नाग डोलतांना
असेल ऐकत तो दूरच्या पहा गोड ताना.
ते बागडणारे मृगांचे आढळतील थवे
कारण ते श्रवती आज हो सुरेल गीत नवें.
सहर्ष पळतांना गोधनें दिसतिल शेतांत
उंचावुनि पुच्छें-मोर्चेलें जणूं नाचवीत

तेवि निर्झरांच्या नद्यांच्या सलिलौघावरती
दिसतिल उठतांना निराळ्या सुरम्य वीचि-तती
असें कोन्दलेलें आज जें गीत अन्तराळीं
आलेखच त्यांचे निर्मिले जणुं जातात जळीं.
असे उत्सवाचे भोंवतीं जर वातावरण
स्वयंप्रेरणेनें हर्षतिल काय न पौरजन ?
आवर्जुन द्याया हवा मग कशास आदेश —
उत्सवांत कीं हो जागवा आज सकल देश !
स्वराज्यांत असली पडेना कधींच ती गरज
जिथें रोमरोमीं नर्तना स्फूर्ति होइ सहज.
एकच भाव तदा अन्तरीं दाटे सकलांच्या
'उदण्ड राज्य करो अम्हांवर हा राजा अमुचा' २८

गजबजुनी गेल्या मशीदी, शिवालयें तैशीं
अनन्य भावानें स्तवाया जगच्चालकासी.
वेदांतील ऋचा घेउनी कोणी आधारा
प्रवचन करि, विनवी शेवटीं जगत्सूत्रधारा.
समुचित ते कोणी म्हणोनी पुराणोक्त मंत्र
स्तविती भावाचा भुकेला दयार्द्र भगवन्त.
प्रविष्ट होइ कुणी घेउनी ग्रंथ कुराण करीं
अल्लातें बाही टेकुनी जानू भूमिवरी.

ख्रिस्तधर्मियांनीं प्रार्थनामन्दिरांत जमुनी
जगत्पिता स्तविला पवित्र-ग्रंथ-सूक्ति-पठणीं.
भिन्न जरी नामें, शेवटीं एकच परमेश
भिन्न जरी झाल्या प्रार्थना, एकच सारांश.
त्या आनंदाचा मिळाया थोडा तरि अंश
चल आपण कविते गाउं तो फिरून सारांशः— ४२

[ जाति—**दिण्डी** ]

सौख्य एका जें, दुःख तें दुजातें
असें भंवतीं येतसे अनुभवातें
अधिष्ठाना परि असे तिथें स्वार्थ
आणि निपजे तेणेंच बहु अनर्थ !

प्रभो ! अमुच्या राजास सुखीं ठेवी
सुखांतुन ज्या सौख्येंच फुलत जावीं
त्याच आणिक सुख-पुष्प-सुगंधानें
प्रजेलागीं लाभोत सुख-स्नानें. ५०

* * *

प्राप्त झालें सामर्थ्य जरि कुणास
तोच अपकारा सजे करायास
दीन-दुबळ्यांना अधिक गांजण्यांत
शक्तिशाली पुरुषार्थ मानतात.

प्रभो! अमुच्या सामर्थ्य दे नृपाला
धीर देइल जें दीन-दुर्बलाला
भक्ति शक्तीची वाढवील लोकीं
गांजल्यांना होईल पाठिराखी. ५८

*      *      *

घरोघर कां दुर्मीळ चित्तशान्ती
शोध करितां येईल कळुनि अन्तीं
नको त्या त्या कीं आचरून गोष्टी
होति चित्तीं हे प्राणिमात्र कष्टी!

नव्हे, कष्टी करतात ही दुजास
बघुनि सहजीं मन सजे प्रार्थनेस—
"प्रभो! अमुच्या राजास चित्तशान्ती
मिळो एकान्तीं तेंवि ती जनान्तीं." ६६

*      *      *

सकल राजी राखणें प्राणिमात्रा
कुणालाही वश नसे सिद्धि-मात्रा
कटू भाषण आचार वा कठोर
घडे हातुन वा प्राप्त हो समोर!

असें अप्रिय नैष्ठुर्य आचराया
माउलीसम पोटांत जरी माया,
पथ्यकर तें ठरतसे खास अन्तीं
आणि अप्रियता जाइ मग लया ती.

आचराया अप्रियहि तें परन्तु
हवा पोटीं विश्वास पथ्य-हेतु !
प्रभो ! देई भूपास भूमिका ही
जींत आन्तर वात्सल्य तें प्रवाही. ७८

*　　　*　　　*

विश्व आहे उद्यान रम्य मोठें
गुलाबाला परि असति तीक्ष्ण काटे
अंग फणसाचें सकण्टक तसेंच
मृत्युलोकीं निर्लेप सुख नसेच !

पुढें येई कधिं नको नको तेंच
विकल होई मन पडतसेंहि पेंच.
प्रभो ! अमुच्या राजास जीवितांत
विवेकाची तरि असो पार्श्व-साथ ! ८६

*　　　*　　　*

‘असे पृथ्वीपति अंश ईश्वराचा’
पाठ केली ऐकिली सन्त-वाचा.
तीच फिरुनी यावया अनुभवास
वाढवी हा परमेश भूप-वंश.

पुरणान्तरिं जें ख्यात रामराज्य
तीर विश्वामित्रिचें त्यास भाज्य
ठरुनि, होवो ही प्रभो, आमदानी
पुराणाची आवृत्ति त्या फिरूनी. ९४

*　　　*　　　*

भिन्नभिन्न धर्मानुयायी ऐसें एक मतें
“शुभ मंगल” अपुल्या वाञ्छिती प्रतापसिंहातें.
भिन्नभिन्न धर्मानुयायी जरि प्रजा राजा
काय भिन्नतेचा करावा त्या गाजावाजा !
धर्म पंथ ज्याचा तया जर मुभा आचराया
का न भिन्नतेची वाच्यता शासनांत वाया ?
प्रजा आणि राजा अहो हे अन्योन्यासाठीं
धर्म-भिन्नतेची न आणा मधें आडकाठी.

‘प्रजा आणि राजा’ जिथें हा धर्म एकमेव
धर्म पंथ यांच्या भिन्नतेप्रति न तिथें वाव.
एकच भाव तिथें अन्तरीं दाटे जनतेच्या —
“उदण्ड राज्य करो अम्हांवर हा राजा अमुचा!” १०६

दा. क्रं.

# हुद्दे-पूजन

[ वृत्त—**शालिनी** ]

यावें हुद्दे-पूजना राजयानें
        राजोपाध्ये पाठवीती निरोप
पूजा-स्थानीं तेधवां राज्ञिसंगें
        येतां झाला लीन सश्रद्ध भूप.

रीतीभाती तंत्रमंत्रोक्त कांहीं
        जे जे पूर्वापार आचार युक्त
संगोपाया सिद्ध जो आदरानें
        लाभे त्यातें लोकचित्तांत तख्त.

ऐसा येता भूप राज्ञीसवें तो
        देती शास्त्री-लोक उत्थापना ते
भूपातें ते वंद्य तत्रापि विप्र; —
        पाळाया तो ना चुके योग्य नातें.

झाल्या स्वाऱ्या जेधवा आसनस्थ
        शास्त्र्यांनीं 'श्रीमन्महा' घोष केला
होई भूमीपाल बद्धाञ्जली तैं
        देखोनीया खड्ग-मुद्रादिकांला.

[ वृत्त—**उपजाति** ]

‘ प्रताप ’ नामांकित तेथ मुद्रा
कट्यार तैशीच समोर भद्रा
समीप गादी कुलसम्पदा छत्र
शूरांगना ती समशेर साच

[ वृत्त—**वसंततिलका** ]

साहेब-नौबत, जरीपटका, असे ते
हुद्दे प्रतिष्ठित सभोंवति पूजनातें,
राशी करी हळद-कुंकुम-सिञ्चनास,
वाही सुगन्ध-सुमनें स्वकरें क्षितीश

[ वृत्त—**उपजाति** ]

पूजा घडे तेंवि जरी सशास्त्र
तरंग भूपान्तरिं ये स्वतन्त्र
ओंवाळता लावुनि आणि दीप
येई तरंगाप्रति गीत-रूप :— २८

[ जाति—उद्धव ]

[ १ ]

मंत्राक्षत-गंध-फुलांनीं
पूजितों तुला समशेरी.
आठवती पूर्वज योद्धे
तुज अशी बघुन सामोरी
तळपत्या तुझ्या तेजानें
दिपविलीं रिपुदळें सारीं
गुजरात
जाहला स्नात
शत्रुरुधिरांत
सदा संग्रामीं
नर्मदा-महीच्या तीरीं
हें स्मरुन गंध-पुष्पांनीं
पूजितों तुला समशेरी. ४१

[ २ ]

जे प्रहार केले त्वां गे
त्या बाळापुर-मैदानीं
थैमान माण्डिलें त्वां जें
अंकलेश्वराच्या रानीं

मराठी ग्रंथ
स्थळ प्र
सं.
सं.
ता.
ठाणे.

बुरुजावर सोनगडाच्या
ठाकलीस ज्या उड्डाणीं
तें दिसे चित्तचक्षूंना
ऐकाया येई कानीं
आणखी
आठवूं किती
प्रभावी कृती
साक्ष इतिहासीं
सापडेल पानोपानीं
म्हणुनि आज तुज समशेरी
पूजितों गंध-पुष्पांनीं. ५६

[ ३ ]

सहचरी अखण्डित तूं गे
क्षत्रियास रणसंसारीं
हें गायकवाड घराणें
आजही स्मरे तव थोरी
हार जो गळां बिरुदांचा
तव महात्म्य तो ललकारी



सोनगडचा किल्ला

अभिमान
उरीं दाटून
कंठ ये भरुन
तुझ्या गुणगानीं
तोकडी पडे ही वाणी
तरि कृतज्ञ तुज समशेरी
पूजितों गन्ध-पुष्पांनीं. ६९

[ ४ ]

तैशींच कैक कटु शल्यें
सलतातहि अन्तर्यामीं
जरि तुझे म्हणवितों स्वामी
स्वामित्व उरे परि नामीं
झालीस कोषबद्धा तूं
आपुल्याच सांप्रत धामीं
उसळून फिरुन तेजानें
रमशील कधीं निज कामीं
जें ब्रिरुद मिरवितों तें मी
वाञ्छितों पटवुं परिणामीं

होउं दे
आपुली युती
वितरुनी द्युती
समर-संचारीं
श्री-कीर्ति मिळवुं माघारीं
मंत्राक्षत-गंध-फुलांनीं
पूजितों तुला समशेरी ८६

[ वृत्त—इंद्रवज्रा ]

भारावल्या ह्यापरि मानसानें
कीं क्षात्रधर्मोचित भावनेनें
येऊन बाहेर नृपाळ पूजी
द्वारांतले ते गजराज वाजी

गन्धाक्षता त्या पडतांच शीर्षी
तो अश्व थय्‌थय्‌ करि नृत्यलीला
त्याच्या अलंकार गळां पदीं जे
मंजूळ खुळ्‌खुळ्‌ करिती रवाला

हातांत घण्टारव आरतीचा
ऐकून नादावुनि जाय अश्व

ज्याचा तयाला मिळताच मान
होई तयातें सहजीच हर्ष

ठेवून निष्ठा हृदयीं प्रगाढा
उत्कर्ष चिन्ती नित जो धन्याचा
मानी इमानी हयराज ऐसा
लाधे तया हक्कहि पूजनाचा

तें जीन पाठीवरलें तयाच्या
मानीत जे कीं 'घर, तख्त' आले
हातून त्यांच्या घडली स्वपूजा
भाग्यें विशेषें हयचित्त धालें

केली तशी उंच गजाधिराजें
शुण्डा स्वयें येउनिया खुषींत
स्वीकार भासे करितो पुजेचा
उंचावि कीं ती अभिनन्दनार्थ.

नोहे गजश्रेष्ठ,—गजान्तलक्ष्मी
द्वारीं नृपाच्या झुलते अखण्ड
तीनेंच आशीर्वच द्यावयाला
केला वरी हात—नव्हेच शुण्ड.



मराठी
सं.
ता.

“ राया ! तुझ्या देवघरांतल्या त्या
मूर्तींहुनी जागृत दैवतें हीं
पूजा तुझी मानुनि घेउनीया
देती प्रसादा शुभ चेष्टितांहीं ”

सांगावया हें नलगे नृपाला
तो सर्व हें जाणुनिया मनांत
त्या चेष्टितां–छे, शुभ त्या प्रसादां
स्वीकारि तैं सादर कौतुकांत

पञ्चोपचारें विधि पूजनाचा
होता यथासांग यथावकाश
घेऊन विप्रोत्तम-संमतीला
ऐका, करी काय तदा निदेशः—१२६

[ जाति—**इन्दुमुखी** ]

चढवा हो चढवा, ही नौबत, हा जरिपटका
आरोपण हें न अता भिववाया रिपुकटका

स्मारक हें केवळ हो त्या गत ऐश्वर्याचें
साक्षीदारच अमुच्या संस्थापक-शौर्याचें
लावि जयाची फडफड हृदयातें परि चटका
चढवा हो चढवा हो हत्तीवरि जरिपटका

धमनीधमनींतुनि जे वाहति शोणितबिन्दू
क्षोभविण्या त्यांतुनिया अभिमानाचा सिन्धू
गातो जो पोवाडा, वीरश्रीयुत फटका,
चढवा हो, चढवा हो, हत्तीवरि जरिपटका

पूर्वीपरि जरि न आज संगर ते झुंजविणें
रिपुरुधिरीं नच आतां रणभूमी रंगविणें
आयुपथीं परि अमुचा ध्येयगुरू नच लटका
पटवाया हें, चढवा चढवा हो जरिपटका


कधिंही कांहींहि घडो आमुचिया नच्च हातें
लाञ्छन जें व्हावें तद्-दिव्य-यशोदेहातें
उज्ज्वल युगजन्मदात्रि व्हाया ही शुभ घटिका
चढवा हो करिवरि ही नौबत, हा जरिपटका. १४४

# राज्याभिषेक

## [ वेदोक्त विधि ]

[ जाति—**समुदितमदना** ]

दिवाणखाना दरबाराचा आप्तेष्टांनीं फुले
पक्व दाडिमापरि मुख तेथें प्रत्येकाचें खुले
साहित्याची सकल सिद्धता विप्रोत्तम निरखिती
साहित्यहि जणुं दिसे प्रफुल्लित चिन्तित मङ्गल घटी
आणि निमन्त्रित अनन्त सागर-सरिता-तीर्थोदकें
कलशा-कलशामधुनि आपुलीं कुजबुजतीं कीं सुखें
तिथेंच होते त्याच सुखाचे स्वतास म्हणवित धनी
दूध दहीं घृत ह्यांनीं भरलें कलश तण्डुलासनीं.
आणि राजदम्पती पातले जेव्हां भद्रासनीं
अधीर किति सोहळा बघाया होई जो तो मनीं.
राजदम्पतीसन्निध ते युवराज विराजति जधीं
अवघ्यांचा शुभचिन्तनिं लागे डुलुं वात्सल्योदधी.
साधुनि जनताप्रसन्नतेच्या अशा मुहूर्त-क्षणा
द्विजवर आधीं गाउं लागले स्तवनें जलदेविंना — १४



शतछिद्रांच्या सुवर्णकलशीं अवघीं तीर्थोदकें
घालुनि, चारी वेद जाणते करिति घोष तें मुखें.

" विविधैश्वर्यें राष्ट्राची ह्या व्हाया समृद्धता
निमन्त्रिल्या ह्या येथ शुभङ्कर तीर्थोदकदेवता.
नुरोत शत्रू, असो सदोदित राष्ट्रीं ह्या अभयता
अहो उदकदेविंनो, असा द्या मङ्गल वर पदनता " १८

प्रास्ताविक अभिवादन ऐसें करुनी उदकांप्रती
सजती द्विज वेदोक्त कराया महाभिषेकाप्रती
सुवर्ण छत्राङ्कित उच्चासन शोभिवन्त तें किती
रंगसंगती भर्जरि शाली त्याभंवती दाविती
ऐशा उच्चासनीं चान्दिचीं माण्डुनि भद्रासनें
विशाल त्यांचेवरी अन्थरुन दिधलीं व्याघ्राजिनें
आणि तयांवर फिरुन पसरलें जरतारी आसन
' लक्ष्मिविलासीं ' लक्ष्मिविलासा उणेपणा कोठुन !
चौरंगावर दक्षिणभागीं विराजती भूपती
वामांगीं सम्राज्ञी बसली ती अवगुंठनवती
राजछत्र, मोर्चलें, चामरें तत्पर करिं घेउन
राजदम्पतीभंवति ठाकले अमात्य चारीजण
शतछिद्रांच्या सुवर्ण कलशीं अवघीं तीर्थोदकें
घालुनि, चारी वेद जाणते करिति घोष तैं मुखें.
अपूर्व ऐसा अभिषेकाचा चाले मंगल विधी
वेदघोष-भावार्थ गुम्फितो रसिका काव्यामधीं — ३४

" पवित्रकर हें वन्दनीय हें जल अवकाशांतुनी
अवतरतांना येइ त्यांतुनी इन्द्र-गर्जना-ध्वनी
संरक्षणशीलता नान्दते ऐशा उदकान्तरीं
देवो धन सामर्थ्य नि होवो मङ्गलकर तें तरी" ३८

* * *

" हे राजन्, अग्निच्या दीप्तिनें तुज आम्ही सिञ्चितों
सुधाकराच्या धवल यशानें तुजसी अभिसिञ्चितों
सहस्रकर-कान्तिनें सिञ्चितों तुझिया शीर्षावरी
वज्रधराच्या शौर्यें करितों अभिसिञ्चन तुजवरी
ऐसा तूं अभिषिक्त गाजुनी होई क्षत्रियपती
रिपुसायकवारणीं देवही येतिल साह्याप्रती " ४४

* * *

" ब्रह्मा विष्णू महेश राजन् करोत अभिसिञ्चन
दशावतारहि तसेच येउन करोत अभिसिञ्चन
ऋग्वेदादिक चतुर्वेद हे प्रजापालका तुज
अभिषेकातें करोत मान्त्रिक सामर्थ्यानें निज
चित्राङ्गद हा चित्रसेन हा चित्ररथहि तेंवि हा
करोत हे गन्धर्व शिरीं तव अभिषेकातें महा



'हे राजन्, अग्निच्या दीप्तिनें तुज आम्ही सिञ्चितों'



राज्याभिषेक समारंभाचें एक दृश्य

आणि सुकेशी तथा सुरूपा अनुत्तमा अप्सरा
करोत अभिसिञ्चना मस्तकीं तुझिया राजेश्वरा
दिवस यामिनी पक्ष मास ऋतु अवयव शुभ ज्याप्रती
कालपुरुष तो करो तव शिरीं अभिसिञ्चन सम्प्रती
आणि दिवाकर शुक्र सुधाकर आदि नवग्रहगण
करो मस्तकीं तव राजेन्द्रा मङ्गल अभिसिञ्चन." ५६

भावार्थाच्या अशा गाति ते विप्र मन्त्र-मालिका
स्वकरें सिञ्चिति तदा अमात्यहि राज्याच्या मालिका
दुधा-दह्याचीं मधा-तुपाचीं करिती सम्मार्जनें
करितां सम्मार्जनें चालतीं फिरुन वेदगायनें.
वेदगायनें घुमून कर्णीं पुनीत झालीं मनें
पावन झालीं सचैल अङ्गें पञ्चामृतसिञ्चनें
आणि तीर्थ-धारांत निघाले नखशिखान्त न्हाउनी
ओघळती जलबिन्दु पहा ते, गमती मौक्तिक-मणी.
अभिषेकोत्तर विप्रवरांची सम्पादुन संमति
नव वसनें परिधान कराया उठती क्षोणीपती. ६६

मुक्यासही हो गिरा स्फुरावी ऐसा तो सोहळा
ऐकावा बधिरेंहि असा तो वेदघोष चालला
अभिसिञ्चनविधि बघुन फिटावें नयनांचें पारणें
जन्मान्धाला आणि गमावें व्यर्थ आपुलें जिणें

अपूर्व ऐशा अभिषेकाच्या विधिपूर्तीस्तव पुन्हा
महाराज मधुपर्कपूजना येती निज आसना
मधुपर्कांच्या पूजनमन्त्रा द्विजवर उच्चारिती
तद्भावार्था श्रोते अपुल्या हृदयीं आलेखिती :— ७४

"वायुवीचि विचरोत सुखप्रद समस्त राज्यान्तरीं
तसे सुखप्रद सरिदौघातें पाझरोत हे गिरी
मधुर ओषधी असोत संतत फलपुष्पालङ्कृता
तरुराजी डौलांत सुखद ही डुलो गगनचुम्बिता
मातृभूत ही वसुधा, तैसें पितृभूत हें नभ
उषा निशा दिन असोत सकलां प्राणीमात्रां शुभ" ८०

तदनन्तर विधि-विष्णु-महेश्वर-पूजन राजेश्वर
करिती, शय्या-धन-पूजनही आणिक तदनन्तर
पुराणोक्त वेदोक्त असे विधि यथासांग उरकुनी
सिद्ध होति आरूढ व्हावया नृपती सिंहासनीं
द्याया तत्प्रीत्यर्थ अनुमती मन्त्रच गाती द्विज
त्या मन्त्रांचें कवनीं परिसा उदात्त हें हितगुज — ८६

[ जाति—**रसना** ]

"अनुकूलता नृपाळा। तूतें असो दिशांची
अनुकूलता दयाळा। तूतें असो जलांची

नृत्यें महोदधींचीं । होवोत भाग्यसाक्षी
सामावलें असो गा । कल्याण अन्तरिक्षीं १०

[ वृत्त—स्वानन्दसम्राट् ]

राज्यामधें ह्या राहो सुबत्ता
ऐश्वर्य वाटो ती नीतिमत्ता
नान्दो समाजीं कर्तव्यनिष्ठा
सर्वत्र चालो सौहार्द-सत्ता

येथील गायी होवोत दोग्ध्री
होवोत योषा तैशा पुरन्ध्री
योद्धे जयश्री आणोत राष्ट्रा
राज्यामधें ह्या नान्दो सुबत्ता.

हे बैल मोठीं वाहोत ओझीं
हे वायुवेगें धावोत वाजी
होवो प्रजा ही आरोग्ययुक्ता
राज्यामधें ह्या नान्दो सुबत्ता.

व्हावी पुरेशी पर्जन्यवृष्टी
कदा नसावा केव्हांहि कष्टी
दुष्काळ-चिन्ता ग्रासो न चित्ता
राज्यांत ऐशी नान्दो सुबत्ता.

तारुण्य होवो पाण्डित्य-गाजी
जो तो स्वकार्यीं राहोच राजी
सर्वत्र चालो सौहार्द-सत्ता
राज्यामधें ह्या नान्दो सुबत्ता

विज्ञानभक्ती वाढोहि छात्रीं
हे शौर्यशाली होवोत क्षत्री
होवो धरित्री ही वैरमुक्ता
राज्यामधें ह्या नान्दो सुबत्ता.

नाहोत तेजें विप्र स्वधर्मीं
निष्णात होवो जो तो स्वकर्मीं
तूं क्षेमकर्ता तख्ताभिषिक्ता !
राज्यांत तूझ्या नान्दो सुबत्ता.

शोभोत बागा पुष्पां-फळांनीं
युवराज तैसे गुणभूषणांनीं
ही एक वाञ्छा पोटीं समस्ता
राज्यामधें ह्या नान्दो सुबत्ता." १३२

# राज्यारोहण

[ जाति—**वल्लभा** ]

गादी-महालाची पहा शोभा किती ही आगळा
गादीमहालाचें जणों सद्भाग्य हें आलें फळा.
सौन्दर्य आधीं ओतिलें ज्याच्यामध्यें शिल्पीजनें
माला, पताका, तोरणें, होती तयातें भूषणें.
देखा विजेचीं विंझणें धरितात फेर वरी किती
कीं अन्तरींच्या त्यांचिया हर्षा जणों नुरली मिती.
तालावरी भ्रूविभ्रमीं हंसीपरी त्या कञ्चनी
नाचामध्यें मागेपुढें रमल्या सभाजन-रञ्जनीं.
नच झुम्बरांतुन लागती तेवावया दीपावली
गादी-महालातें जणूं हीं लोचनें हो लाभलीं.
गादीवरी येणार हो प्रिय आज गुर्जरभूपती
अपुरेच होतिल नेत्र ते जरि लाभले त्यातें किती. १२

सामन्त, देशोदेशिंचे राजे, महाराजे कुणी
करवीर-छत्रपती तसे उमराव आप्त सखे ऋणी
कोलिंगडाधिपतीसवें जामात कोचिन-भूपति
युवराज म्हैसुरचेहि ते परिवार घेउन ठाकती.

आले तसे सीतामहू-देवास-फलटण-धारचे
राजे उदेपुर-पोरबन्दर-कच्छ-कूचबिहारचे.
तैशींच राजकुलें किती इतिहासभूषण भारतीं
देतात धाडुन आपुल्या समयज्ञ मानकऱ्यांप्रती.
आले तसे पदवी-पदस्थहि आङ्ग्ल-राजवटींतले,
संस्था ऋणाइत शिष्टमण्डळ धाडिती आपापलें.
ऐशापरी दरबार तो सन्मान्य लोकांनीं फुले
आनन्द सर्वांच्या मुखीं नाचे, जळीं जैं मण्डलें.
कोणाचिया कण्ठी गळां, कोणाचिया माथां तुरा,
कोणी अलङ्काराविना वंशीं परी अपुल्या हिरा.
रंगीत वस्त्रांची प्रभा बिम्बे कुणाच्या आननीं,
द्रव्यें सुगंधित लावुनी कान्ती मुखीं आणी कुणी.
त्यांच्याच कोणी पङ्क्तीमाजी दिसोनी येतसे
कर्तृत्वतेजें जो खुले, शीर्षीं सुकीर्तीचीं पिसें.
कोणी बडेजावाविना हलकेच येवोनी बसे
सन्मान आजूबाजुचे देती तया, न कळे कसें !
न कळे कसें हो एवढें ? सत्ताधिकारी तो खरा
सत्तेपुढें होतो अहो निस्तेज तो मोती हिरा
सत्तेसही जो लाजवी तो हा कुणी ये निःस्पृह
ऐश्वर्यवन्ता होतसे कान्ती तयाची दुस्सह.

सर्वांसही नमनीय जो तो हा कुणी विद्यानिधी
येई सभास्थानीं पहा गम्भीर भासे अम्बुधी.
गादीमहालीं यापरी येती समुत्सुक सज्जन
होती विराजित पाहुनी आपापलें मानासन.
ते लोक—छे, लक्ष्मीच कीं नाना स्वरूपें घेउनी
ये स्वोत्सवा देखावया ह्या शेंकडो नेत्रांतुनीं.
आकाशमार्गी धावुनी ये सप्तवाजीवाहनीं—
भानू, मनीं वाञ्छा करी साधावया कीं पर्वणी!
त्याच्याच चालीनें परी घटिका शुभङ्कर येतसे
अवधान हें नच त्या कसें? कीं उत्सवें लागे पिसें? ४६

आले पहा, आले पहा; "श्रीमन् महाराजाधिराज्!"
ते वेत्रधारी गर्जती दर्बारचे रीती-रिवाज्
जरि गाति ते नृपतीस्तुती, तेणें सभालोकांप्रती
सहजी इषारा होइ कीं येती अहो गादीपती.
तों स्तब्धता चोहींकडे, दृष्टी महाद्वाराकडे
ऐसे सभाजन राहती आपापल्या जागीं खडे.
गादी सुसज्ज दिसे पुढें, बाहू जणों पसरून ती
सुस्वागता आलापिते "ये राजया! ये श्रीपती!"
येई हळूहळु भूपती निकटी तशी घटिका शुभा
तैं पादपीठीं ठेवुनी पद आपुला राही उभा.

तें पादपीठ न, भावलीं त्या पूज्य पायाखालती
हृदयेंच पायघडीपरी अपुलीं सभालोकांप्रती.
जनतान्तरांतिल तों नृपा कीं स्पन्दनें आली कळूं
जावीं मुळीं न दुखावलीं, पद ठेवि तैं म्हणुनी हळूं.
त्या पादपीठीं ठेवुनी पद भूपती क्षण थाम्बला
क्षण तों सभा-जन-चित्तसागर ईप्सितीं आन्दोळला.
त्या पादपीठीं ठेवुनी पद भूप पाही भोंवती
कीं सभ्य लोकांची जणों घेतो कटाक्षें सम्मती.
छे, पाहतो तो भोंवती घ्याया न सम्मति केवळ,
वाचावया लागे जणों जनवाञ्छितें नयनांतिल — ६६

[ वृत्त—**शार्दूलविक्रीडित** ]

राज्याला उपमा विशाल तरुची देतात काव्यान्तरीं
राज्याचें अभिधान ह्या सुत्रवि कीं ती पूर्ण आहे खरी
शाखांलागि मुळें, प्रजा तशि नृपा, हा न्याय जी दर्शवी
त्या गादीवर श्री प्रताप विलसो छाया कराया भवीं !

होते गायकवाड भूपति कलासंगीतभोक्ते, तसे —
पोशिंदे, — इतिहास साक्ष भरता अद्यावधी देतसे.
योगक्षेम तहाह्यात करुनी दे जी कलोपासकां
त्या गादीवर श्री प्रतापनृपती शोभो कलांचा सखा !

आहे शिक्षण एक साधन खरें व्हाया जनीं उन्नती
ग्रन्थोत्पादन होइ पूरक तया, रथ्या जसा सारथी,
हें जी जाणुनि जाहली रत सदा विद्यामृतप्रोक्षणीं
त्या गादीवर श्री प्रताप विलसो विज्ञान-संवर्धनीं !

प्रज्ञावन्त गणी न दैन्य रमुनी कार्यांमधें स्वीकृत,
ती प्रज्ञा परि, दैन्य आड म्हणुनी, लाभे न लोकांप्रत;
वाराया तरि दैन्य तें झिरपली कादम्बिनीसारखी
त्या गादीवर श्री प्रताप विलसो प्रज्ञानिधी-पारखी !

"ज्यांनीं शोभविलें पदां शिशुपणीं त्या तोरड्या पैंजण
प्रौढत्वीं मिरवाल का, पद जरी जाती तयीं काचुन ?"
रूढीचीं जड जोखडें उडविलीं या युक्तिवादें जिनें
त्या गादीवर श्री प्रताप विलसो उत्कर्षकांक्षी मनें !

लोकीं आडुनि राहिले किति तरी सङ्कल्प, कार्यें महा,
कीं ज्यांची परिपूर्ति होइल जनां उत्कर्ष-सौख्यावहा;
त्यांचा घेउनि शोध कल्पलतिका जी जाहली त्यांजला
त्या गादीवर श्री प्रताप नृप त्या शोभो गुणीं आगळा !

"काळाच्या, बनु बोळकीं न सुगडें, कुम्भारवाड्यांतलीं;
काळाला घुमटापरी घडवु या — स्पष्टे असे व्हा बळी.
कर्तृत्वा पद जन्म जात नलगे" हा पाठ दे जी जनां
त्या गादीवर श्री प्रताप विलसो राष्ट्रीय-सञ्जीवना !

'केलें कांहिं असेल आजवरि तें बीजस्वरूपीं च कीं,
जोपासून तदीय वृक्ष करणें तो पुत्रपौत्रादिकीं'
जी ऐशा वचनीं असे निरविली भावी पिढीच्या करीं
त्या गादीवर श्री प्रताप विलसो बालार्क-बिम्बापरी !

शस्त्रास्त्रें जगतीं अजस्र किति ह्या आहेत बोकाळलीं
एकातें दुसरा, दुजास तिसरा तेणें गिळी, हो बळी.
स्पर्धेच्या असुरी रणांत विजया जी मार्ग दावो नवा
त्या गादीवर श्री प्रताप बसुनी संपादवो वाहवा !

स्पर्धेच्या असुरी रणांत असिला औदार्यपाणी असो,
शत्रूंना निवटावयास नयनीं सद्धेतुदीप्ती वसो.
सौजन्यासम ढाल ना, कवच ना, दुर्भेद्य संरक्षणा,
शोभो हा सुगुणीं प्रताप नृप ह्या साचार सिंहासना ! १०६

[ जाति—**वल्लभा** ]

जननेत्र–बिम्बित वाञ्छिता ये दीर्घता कवनीं जरी
एका कटाक्षें भूप तीं घेई क्षणीं टिपुनी परी.
गादीवरी आरोहणाचा दिव्य तों आला क्षण
पद केंवि लाविल गादिला भारावलें परि यन्मन ?

चित्तांतल्या चित्तांत तैं श्रीबेचराई वन्दुनी
" द्या पूज्यपूर्वज ! बालका आशीर्वचें" प्रार्थी मनीं —
"जो जें नयें वाञ्छील तें द्याया तया, भोगेश्वरा !
दे वासना, दे शासना चातुर्य, दे बळ ह्या करां.
शिर्बन्द शोभे मस्तकीं, पोषाख हा अङ्गावरी
विख्यात हा कण्ठा गळां–मोहें न धारण मी करी.
सौख्योपभोगांकारणें नोहेच हें सिंहासन !
व्हावें प्रजेच्या आपदांचें गादी वरोनी वारण !
ही जागृती द्याया मला शिरताज हा माथां हवा
वक्षःस्थळीं राहून हा कण्ठा मला होवो दिवा.
हे विप्र हो, हे क्षत्र हो, हे वैश्य हो, हे शूद्र हो,
सर्वांचिया सौख्यार्थ मी ही सेवितों गादी अहो !
सौख्योपभोगांकारणें नोहेच राज्यारोहण
ही जाग राहो अन्तरीं कीं दिव्य हें व्रतपालन." १२४

प्रगटे उषःकालीं जसें रविबिम्ब कीं क्षितिजावरी,
किंवा प्रफुल्लाब्जांतुनी पसरे सुगन्ध सरोवरीं,
आम्रा वसन्तीं येतसे जैसा तरारुन मोहर,
कीं आर्णवक्षोभांतुनी रत्नावली ये बाहिर,

रत्नांतुनी झळके प्रभा, स्वर येति जैं वीणेंतुनी,
सङ्कल्प हा प्रगटे तसा नृपचित्तकल्लोलांतुनी.
साधून भूप मुहूर्त तो, टेकून जानू दक्षिण
करि, उत्तरामुख होउनी, गादीवरी आरोहण. १३२

आनन्दली सारी सभा नृप देखुनी गादीवरी
जयघोष झाला तेधवा सुमवृष्टि झाली तत् शिरीं.
पञ्चारती घेऊन तों करिती सुवासिनि औक्षण
अग्रेसरा भूपाग्रजा करवीर-राज्ञी त्यांतुन
पञ्चारतीहुन शोभले प्रेमार्द्र तीचे लोचन.
प्रेमादरें करिती तसे मुजरे लवून सभाजन.
केला दिवाणानीं तदा भूपा अहेर समर्पण
ठाकोर देती खण्डण्या एकेक एकामागुन
नृप गौरवी परतून तों प्रेमादरें सकलां जनां
तो होय ‘राजा’ सार्थ जो सजतो प्रजेच्या रञ्जना.
अर्थेंचि या फैरी झडूं कीं बंदुकांच्या लागती
तोफा धडाधड गर्जुनी व्याख्या जगा ही सांगती.
वाद्यांचिया साथीसवें, तोफांचिया तालावरी
लागे चराचर गावया जयघोष थोर वटोदरीं— १४६

[ चाल—"**धोये महोबे घाट**" ( "पुकार"–चित्रपट ) ]

बोला त्रिवार जयजयकार
बोला त्रिवार जयजयकार
ज्या गादीला रणशूरांची —
होइ जन्मदा शूरांची तलवार
देई स्थैर्य बुद्धिची धार
शोभा गुणांचीच जरतार
आज तिच्यावर वाजत गाजत विराजती सरकार
श्रीमत् प्रतापसिंह उदार
अमुचे दयाळु पालनहार

[ धडाड्धोम् धडाड्धोम्
धडाड्धोम् धडाड्धोम्
धडाड्धोम् धडाड्धोम् ]

त्रिवार जयजयकार
बोला त्रिवार जयजयकार
नाचो नभीं नेहमीं ही पताका
थारा न देवो कधींही कलङ्का
सम्पूज्य होऊन भूदेव — कङ्का
गाजो तियेचा त्रिखण्डांत डङ्का
त्रिवार जयजयकार
बोला त्रिवार जयजयकार ॥ १ ॥

नरवीरांची परम्परा जणुं—
धारण करि जो नररत्नांचा हार
प्रतापी वीरवरांचा हार
प्रभावी नररत्नांचा हार
सुमुहुर्तांवर तोच आज हा शोभविती दरबार—
श्रीमत् प्रतापसिंह उदार
अमुचे दयालु पालनहार

[ धडाड्धोम् धडाड्धोम्
धडाड्धोम् धडाड्धोम्
धडाड्धोम् धडाड्धोम् ]
त्रिवार जयजयकार
बोला त्रिवार जयजयकार

सांभाळ भूपाळ सूर्या ! शशाङ्का !
पाळो नयानेंचि श्रीमन्त-रङ्का
राहो न कोणाहि कल्याण-शङ्का
गाजो यशाचा त्रिखण्डांत डङ्का.
त्रिवार जयजयकार
बोला त्रिवार जयजयकार ॥२॥ १८२

# कैद्यांची मुक्तता

[ जाति—**चन्द्रकला** ]

गडगडल्या तोफा कराया जाहिर जगतास
गायकवाडांच्या लाभलें भूषण गादीस.
गडगडल्या तोफा, निनादुन अम्बर तों गेलें
कैदेंतिल बन्दी अन्तरीं प्रमुदित तों झाले.
तोफांनीं झाली तयांची सुटका जाहीर.
गडगडुनी उघडें लागलें व्हायाला दार.
आणिक पालटले तयांचे रंग-रूप-वेष
मुखीं खुलूं लागे जिण्याचा नवीन आवेश.
कितीतरी बाकी अजूनी असतांना मुदती
पायींच्या त्यांच्या शृङ्खला ओघळती पडती.
कधिं जाउनि मिसळूं आपल्या मुलां-माणसांत
अधीरतेची ह्या दाटुनी मानसांत लाट,
ओलांडुनि आले उम्बरा जेव्हां बाहेर
नवल पाहती कीं तुरुङ्गहि करितो शृङ्गार.
गभीर भीषणता असावी जिथें दाटलेली
प्रसन्नता तेथें दिसोनी येई फुललेली.

गुढ्यां-तोरणांनीं सुशोभित झालें आवार
आज तुरुङ्गाचें लोपलें तुरुङ्गपण पार.
अवलोकुन ऐशी सजावट, मुक्त गुन्हेगार —
मुदें नृपाळाचा गर्जती जयजयजयकार.

सहजच आठवले तयांना गुन्हे आपलाले
आणि विचारांचें मानसीं भ्रमण सुरूं झालें —

“ अगा लोकपाळा ! करोनी गुन्हे सान थोर
कवटाळुन आम्हीं घेतला बन्दिवास घोर
सुनीतिच्या वाटा सोडुनी मार्ग अनीतीचा
पत्करला जेव्हां काय तो सुखासुखी साचा ?
कलङ्क लावियला आपुल्या आम्ही शीलास
कुटुम्बियांसङ्गें कलङ्कित केलें स्वकुलास
गुन्हेगार का हे गुन्ह्याच्या केवळ मोहानें
झाले कीं अथवा घोरतर जीवन-कलहानें ?

वायां जाति घरीं धन्याच्या पक्वान्नें रोज
परी वाढप्याच्या मुलाला मिळेच ना पेज
अशा वाढप्यानें पकवुनी गुपचुप जर हण्डी
क्षुधित बालकांच्या घातले घांस जरी तोण्डीं

तरी वाढण्याला कायदा ठरवितसे चोर
तुरुङ्गांत आणी बान्धुनी दण्डाला दोर ३६

कुणी डोइवरुनी आणितो सर्पण शहरास
दोन चार दिडक्या कमाई लागे हातास.
जरी सर्पणानें दुजांच्या घेति चुली पेट
मोळिविक्या कण्हतो ‘ कसें मी भरूं तरी पोट ’
जाय उपासानें जेधवा पोट भकाटीला
नीति-अनीतीच्या विवेका वाव तरी कुठला ?
वाढ कमाईची व्हावया दिढी-चौपटीनें
त्वचा-रंग त्याचा मानसीं हळूहळू बाणे
आणि साथ जेव्हां त्वचेला देइ कृष्ण रजनी
कृष्ण कृत्य करुनी जाइ तो जङ्गलांत पळुनी.
मोळिविक्यालागीं गिऱ्हाइक नागविते, हाय !
गिऱ्हाइकावरि तो उलटवी रात्रीला न्याय !
न्याय रात्रिचा तो रुचेना परन्तु दिवसाला
जङ्गलरहिवासी येतसे तुरुङ्गवासाला.
खडतर वाटावा कशानें तुरुङ्गवास तया ?
मुळींच ना नाहीं तयाची देह राबवाया !
पुरेसें न देई तयाच्या श्रमांस जग मोल
भुकेमुळें गेला तयाचा म्हणुन तसा तोल.

अन्नवस्त्र येथें पुरेसें श्रमांस त्याच मिळे
खुलेपणापेक्षां तयांना तुरुङ्ग परवडले ! ५६

आणि इथें कोणी, न केवळ कैदी स्वार्थाचे,
सुस्कारे ऐका तयांचे ते सार्थकतेचे.
बलिष्ठ पिळवटुनी काढितो खुशाल दीनास
देइ मान अपुली दीनता मुकाट चरकास
आणि कायद्यानें गुन्हाळें सुरक्षीत असलीं
दिमाखांत मोठ्या गर्जती किति गल्लोगल्लीं
अशा गुन्हाळांची चालली भरभराट बघुन
मानवतेचा जो चालला असा रोज खून
सरसावुन कोणी थोपवी करकर चरकाची
करी धिटाईनें वकीली अजिव्ह दलितांची.
केवि बलिष्ठांना रुचावी अशी दाण्डगाई ?
अविलम्बें त्याच्या शृङ्खला बिलगतात पायीं ! ६८

तुरुङ्गांत ऐसे डाम्बले अनेकविध कैदी
आज मुक्ततेनें जाहले सहजच आनन्दी.
परि ते कैदेचें कशास्तव पतकरती पेव
शोधाया नृपते सुबुद्धी तुज देवो देव !
आणि विषमतेची नुरावी तव राज्यीं शल्यें
राज्ययंत्र ऐशा चालवी उदण्ड कौशल्यें.

दिन आनन्दाचे उगवतां पुढें उत्सवाचे
पडो न कैद्यांना प्रयोजन खुलें करायाचें.
सुराज्य तेंच खरें जयामधि तुरुङ्ग ओस सदा
गुन्ह्याकडे तैशी जनांची झुके मती न कदा" ७८

असे मुक्त कैदी नृपातें प्रभूत देत दुवे
आणि अपेक्षांचे मानसीं उभवित देखावे
करीत सङ्कल्पा चालले 'होउं शुद्ध शील'
अभिषेकोत्सविं ते नृपाच्या झाले सामील. ८२

[ जाति—**दिण्डी** ]

वियोगार्तांच्या ओढ अन्तराला
असे स्वाभाविक जायची घराला
अहो देखा परि नवल घडुनि आलें
राजधानीला मुक्त कैदि आले.

घरीं कोणाची माय बघत वाट
आणि कोणाचा तिष्ठतोहि तात
'अतां कलिजा भेटेल किति दिसांनीं'
म्हणत भिजविति लोचनें आसवांनीं

आणि खडखड ऐकतां वाहनांची
  उरीं धडधड कालवा — कालवीची !
मायताताची परी एक मूर्ती —
  राजनिष्ठांना क्षोणिपती तख्तीं !

मायतातासम असा लोकनाथ
  आज गादीला करितसे सनाथ
म्हणुनि उत्सवसमृद्ध राजधानी
  होइ आकर्षक तयां घरांहूनी. १८

ठाणे.

# अन्नसन्तर्पण
# व
# शिष्टसम्भावना

[ जाति—**भुवनसुन्दर** ]

बडोदा थोर राजधानी
थाटली उंच हवेल्यांनीं
तशांतहि आज तिची शोभा
दुणावे गुढ्यां-तोरणांनीं
तशांतहि तियेस मोहकता
लाभली सुरेल वाद्यांनीं
पातला पूर तेवि दुथडी
प्रमोदा सकलान्तःकरणीं.

शिपाई स्वार राजमार्गी
दुतर्फा अशोक तरुमधुनी.
पालवी तजेल कोमल त्या
तरूवर वासन्तिक बघुनी
कल्पना कुणासही यावी
सहज कीं महोत्सवाभरणीं —
न केवळ मिरवितसे जनता,
डोलती वृक्षहि स्वस्थानीं.

आणि जों गडगडल्या तोफा
  अहो दिग्गजही हादरले.
पुन्हां त्या निनादता तोफा
  सातही समुद्र थयथयले.
रणांतिल हीं तर शस्त्रास्त्रें
  तयांचीं परि न इथें भीती,
वाटणें प्रमोद वा भीती
  सर्वथा प्रयोजका—हातीं!
गर्जितें ऐकुनिया ज्यांचीं
  दुभङ्गुन वक्षकोट जाती
तयांच्या आज निनादांनीं
  प्रफुल्लित वक्षकोश होती.
गर्जितें आज सुमङ्गल हीं
  सुखाशा पालवितीं चित्तीं
गर्जता मेघ जेवि गगनीं
  खुलावट वसुन्धरेवरती. ३२

अशा समृद्ध दंगलींत
  अशा ऐश्वर्यनर्तनांत
दीनता दरिद्रता कुठुनी
  बघाया मिळेल कां चुकुनी

कल्पना विजेपरी चमके
  आणि करि मनास साशङ्क
हवी परि कशास हो शङ्का ?
  जिथ श्रीमन्त तिथें रङ्क !

भर्जरी जिथें शालु शेले
  गांठवी तिथें कुणी ठिगळें !
कपाटामधें थोप लुगडीं
  पथीं परि पोर फिरे उघडी !
हरघडी हवा नवा फेटा
  असा जरि दिमाख कोणाचा
तयाच्या कुणी वळचणीला
  तुटवडा जयास चिन्ध्यांचा !
पंगतीमधिं पक्वान्नांचा
  जिथें घमघमाट सुटलेला
तेथल्या दरवाज्यापुढतीं
  भिकारी जमले उष्ट्याला !

कशाला अशा विषमतेची
  पाहिजे वाटाया खन्ती ?
असे हा न्याय निसर्गाचा
  कुठेंही पडेल हो दृष्टी.

नभाला ताड माड भिडती
तयांच्या परि बुन्ध्याभवती
जन्मतीं खुजीं तृणें, अन्तीं —
चुरडलीं पायदळीं जातीं

परी ह्या काय युक्तिवादें
पडे समजूत दयाळूची ?
श्रवोनी युक्तिवाद, त्याची
विरे का लाट कळवळयाची ?
पुसे तो उलट "युक्तिवादें —
शमे का क्षुधा क्षुधार्तांची ?
कधीं का युक्तिवाद–वचनीं
लागते सोय निवाऱ्याची ?
तृणांसहि हवें जगायाला
( कुठूनहि येवो परि ) पाणी;
तयांना हवें गोन्जराया
भानुच्या वत्सल किरणांनीं;
वाञ्छितीं तृणें जोजवावें
वायुनें अपुल्या झुळुकांनीं
निसर्गहि भेदभाव तैसा
ठेवि नच कधिं जीवनदानीं."

आणि हें जाणतसे जो कीं
  स्वताला म्हणवि लोकनाथ
न देई दयालुता त्याची
  तयाला बसूनिया स्वस्थ. ८०

शिरावरि हवा जया मुगुट
  बसाया हवें जया तख्त
तयानें निराश्रितांसाठीं
  खपाया नको काय सक्त ?
भुकेनें तडफडता कोणी
  तयाचा शाप नृपाळाला !
विवस्त्रहि खुडखुडता कोणी
  तयाची चाड लोकपाळा !
स्वराज्यीं अशा विषमतेला
  द्यावया हवी मूठमाती;
क्षणार्धीं साध्य कसें परि तें ?
  तेंवि तें का एका हातीं ?
पेरितां धान्य येति त्याचीं
  पिकें षण्मासीं पदरांत;
परन्तू रुजून अक्रोडा
  फळाया तपें लागतात. ९६

सम्प्रतीं परी उत्सवांत
नसावा कुणी क्षुधाव्यथित,
नसावा कुणी वस्त्रहीन,
नसावा कुणी खिन्नचित्त;
म्हणोनी आज्ञापी नृपती—
"करा हो करा अन्नदान.
धडोतीं काम्बरुणें वाटा
तशीं दीनांस अङ्गभरुन.
तयांचे बोल तृप्ततेचे
मला देतील समाधान
तयांचे दुवे अहो माझें
सुखांचे भविष्य सोपान."
मनीषा अशी नरेशाची
पसरली जनांमधें त्वरित.
थवेच्या थवे भिकाऱ्यांचे
निघाले गणगोतासहित.
फुलांतिल जैसे मधुबिन्दू
लागती धुण्डाया भृङ्ग
शर्करा-कणिका-रोखानें
लागते मुंग्यांची रीघ ११६

घरोघर हिण्डुनिया तुकडे
जमविती रोज शिळेपाके
वाटती कुटुम्बियांमाजी
स्वताला कोरडेच फाके
जयांची ऐशी गुजराणी
तयांची तनु केवळ खोकें
पातले असे अर्धपोटीं
उपाशी तेथ खात झोके.
पोटभर आज तरी खाया
लाभतिल गोडगोड घास
तयांच्या पावलांस थकल्या
चालवी हीच एक आस. १२८

अर्भकें कैक तशिंच आलीं
कटोरे सरसावित अपुले
आन्धळे लुळे पांगळेही
करोनी माळ तेथ घुसले.
'कुणाचें काय अम्ही खातों ?
अम्हांला रामराय देतो'
मुखीं जे घोकिति हा मन्त्र
सेविती तेहि सदावर्त.

म्हणावें ‘उदरभरण ज्यानीं
   असे हें होमहवन मात्र’
असे कौपीन – जटाधारी
   घ्यावया येति अन्नवस्त्र
गळां रुद्राक्ष-माळ, देहीं
   चर्चिलीं भस्मपुटें दाट,
असे निस्संगहि बैरागी
   काढिती घोळक्यांत वाट. १४४

कुणाचा असो पन्थ कांहीं,
   कुणी मिरवोहि कांहिं झेण्डा,
भुकेला किमान तरि कोण्डा,
   निजेला निदान तरि धोण्डा,
एवढें अपेक्षितो जो तो
   जोंवरी कुडीमधें प्राण;
आणि झिजवितोहि उम्बरठे
   जोंवरी करीं पदीं त्राण!
आणि धरि म्हणून ती वाट
   नृपाच्या जिथें सेवकांनीं—
ठेविलें द्वार मुक्त सकलां
   आजला अन्न-वस्त्र-दानीं. १५६

[ जाति—**दिण्डी** ]

नृपौदार्यांतें येउनी उधाण
असें चौका-चौकांत अन्नदान
राजधानीमधिं चालले सुदीनां
तेंवि अवघ्या राज्यांत गांवगन्ना

पाहुण्यांना तैसेंच आदरानें
देइ इच्छाभोजना आग्रहानें
आणि जोडोनी हात नम्रभावें
भूप विनवी पङ्क्तींत 'स्वस्थ व्हावें'

तसे इकडे बैसले आप्त-इष्ट
शिष्ट सम्भावित कुणी द्विजश्रेष्ठ
तृप्त होती स्वाद्वन्न-भोजनानें
भोजनोत्तर ते करिति वेदगानें. १६८

[ वृत्त—**वसन्ततिलका** ]

आशीर्वचें वितरती द्विज वेदगानीं
होई विलीन नृप त्यांपुढतीं म्हणोनी
मन्त्राक्षता सकल तैं द्विज वर्षतात
त्या सेव्य मानि मुगुटाहुनि लोकनाथ.

सम्भावना मग करी सहजी तयांची
वस्त्रें समर्पुनि तयांप्रति भर्जरीचीं
देऊन तेंवि धन काञ्चन-दक्षिणार्थ
झाला तयांसह मनीं नृपती कृतार्थ. १७६



'वस्त्रें समर्पुनि तयांप्रति भर्जरिची'

# देवदर्शनाची स्वारी

[ जाति–**लवङ्गलता** ]

देवदर्शनासाठीं सजली श्रीमन्तांची स्वारी
नृपाळ बोले तों दल हाले राजमहालद्वारीं
झटून सारे चाकर नोकर करिती पूर्ण तयारी
उणीव कसली तिथें, राबती ऋद्धिसिद्धि जर चारी.

नगारखाने झडूं लागती, वाजुं लागती भेरी
सुटती मधुनी-मधुनि बन्दुकां-कडाबिनींच्या फेरी.
स्वरालाप तों सुरेल मञ्जुळ काढुन सनयांमधुनी
प्रसन्नतेचा भाव तयांमधिं निर्मियला गुरवांनीं

रंगविलेले, भूषविलेले पटांगणामधिं दन्ती
लोंबति ज्यावरि झुला भर्जरी, ते सङ्गीतीं डुलती.
कण्ठ गजांचे कुयऱ्या-घुंगुर-माळांनीं गजबजले
तेंवि सांखळ्या, गोफ, रेशमी गोण्डे-पदरहि रुळले.
घणघण किणकिण नाद घण्टिका एकसारखा करिती
दुणावतो तो माहुत जेव्हां अङ्कुश मारी वरती.
अम्बारी चान्दिच्या कितीकांवरी आयनेदार
त्यांत आप्त युवराज विराजति मानकरी सरदार

आणि झळकते ही सोनेरी खाशा स्वारीसाठीं
मोत्यांच्या झालरा तियेच्या सभोंवार झगमगती.

अम्बारीमधिं विराजतां तो गजान्त-लक्ष्मीनाथ
रुमाल चवरी मोर्चेल किङ्कर भंवति उभे धरतात
गजारूढ होतांच ह्यापरी गजान्त-लक्ष्मीकान्त
शहाजणांच्या ललकाऱ्यांनीं दुमदुमला दिक्प्रान्त.

देवदर्शना ऐशी निघतां श्रीमन्तांची स्वारी
राजपथीं लोटती दुतर्फा बाल-वृद्ध-नर-नारी
जरिपटक्याचा गजेन्द्र चाले अघाडीस डौलांत
पायदळाचीं पथकें मागुन तसेच भालाईत
नाचत नाचत निघे रिसाला आणिक मागोमाग
अन्तर राखायास चालतो थबकत जागोजाग
हुजरातीची अशी चालते सेना ती लकलकती
भले भले सरदार पदाती मिसलीनें अनुसरती.

खाशांचा चालता समोरुन गजेन्द्र मन्दगतीनें
सलाम मुजरे करिती प्रेक्षक सादर तत्परतेनें
गजेन्द्रही चालतो जनांना करीत मुजरे परत
जाणुन जणुं कीं करील कुठवर परत तरी निजनाथ.

सौधावरुनी गवाक्षांतुनी लावुन कौतुकदृष्टी
करिति पुरन्ध्री बालबालिका रायावरि सुमवृष्टी
श्रीमन्तांपर्यन्त पोंचलीं जरि न फुलें सकलांचीं
साक्ष मनोमन मिळे प्रजेच्या तयास भाविकतेची.

अशा सरंजामांत चालली श्रीमन्तांची स्वारी
थाटमाट वर्णील लेखणी तीचा काय बिचारी ! ४०

मराठी ग्रंथ
स्थळ
सं.
ता.

# कीर्तिमन्दिराच्या गाभाऱ्यांत

[ जाति—**लवङ्गलता** ]

धन्य कल्पना कीर्तिमन्दिरा निर्माया जी नटली
धन्य खरोखर कवीहुनी तो नृपती प्रतिभाशाली
कल्पनेस कीं कारागिरिला मोल द्यायचें बोला ?
कारागिरिला म्हणाल तरि त्या पहाच ताजमहाला
त्रिखण्ड कीर्ति गाजत ज्याची तो हा ताजमहाल
बादशहाच्या प्रणयाचें तें स्मारक भव्य विलोल
अलोट ओतुन पैका, जमवुन अगणित कारागीर
बादशहा शोभवी मनोहर कृतिनें यमुनातीर.
असाल हिण्डत परन्तु जर का दिव्य कल्पनेसाठीं
चला रसिक हो, कीर्तिमन्दीरा विश्वामित्रीकाठीं.
इतिहासामधिं जरि कांहींचीं नांवें लकलकतात
तुल्य गुणी परि कितिक राहिले असतिल जन अज्ञात
अशा नामिका-अनामिकांची अभिवन्दुन पुण्याई
जन-हित-कर्ता कीर्तिमन्दिरीं लावुन ठेवी समई. १४



कीर्तिमंदिर

ताजमहालापुढतीं मन्दिर जरि समईसम सान
कृतज्ञतेचें उदात्ततेचें परि रवि-बिंब महान
वैभव नाहीं इथें ओतलें दिपवायाला नेत्र
आत्मोन्नतिच्या यात्रेकरुंना परि हें पुण्यक्षेत्र
इथें न येणें सौंदर्यानें व्हाया विस्मयचकित
पुनीत होउन आयुपथीं या व्हाया येथ सुनीत
प्रणयकथेंतिल अखेरचा तो अश्रू-पूर्णविराम
इथें चिरन्तन चैतन्याच्या सरितेचा नव उगम. २२

धारण केला देह जयांनीं विशेष काजासाठीं
त्याच कारणीं आणि ठेविला देहहि धारातीर्थीं
असें जयांचें भाविपिढीला कार्यप्रेरक चरित
मन्दिर जणुं हें श्राद्धविधी कीं तिलाञ्जली त्या मूर्त. २६

श्राद्धविधी वा तिलाञ्जली – ते मंत्रतंत्र ते नुसते
आचरणें का वर्षामधुनी एकच दिवसापुरतें ?
वर्षदिवस तो व्यवहाराची किमानपक्षी सोय;
स्वपूर्वजांच्या मुक्ति ऋणांतुन न तेवढ्यानें होय.
सोयीस्तव तो मंत्रतंत्रविधि, दिवसापुरता थाट,
परि ठेवाया हवा आयुभर पूर्वज-गुण-परिपाठ.

रहदारीवर उभारिलें हें मन्दिर कीं आदर्श
नौबद नन्दादीप पताका हाकारीत जनांस —
“ देह आणि गुण तुझे मानवा अन्तर यांत अनन्त
क्षणांत विलया जाइल तनु, गुण सुस्थिर आकल्पान्त ”
हेंच सुभाषित, नच शब्दांनीं, माती-दगड-विटांनीं
उभें ठेविलें करुन नृपानें वाचाया पथिकांनीं. ३८

म्हणुन पातले महाराज त्या कीर्तिमन्दिरापाशीं
दिवंगतांच्या पुण्यात्म्यांच्या मागायातें आशी.
ज्याचा त्याचा जरी पराक्रम मुठींत साठविलेला
आशीर्वचनें शीघ्र सफलता देती तेवि तजेला.
म्हणून माथा प्रणिपातास्तव करिती तेथ विनीत
तोंच भासलें घुमतें गाभारियांत मङ्गल गीत —४४

उमल उमल रे फुला,
फुलून भूषवी कुला.
उमलत्या दला-दला —
मधून वितरि परिमला.

स्थान-रूप-लाभ हा
सुकृत पूर्व कीं महा
येतसे तुझें फळा
उमल उमल गा फुला !

आयु, देह, सम्पदा —
ऋणें तुझ्या शिरीं बुधा
जाग अन्तरीं जरी
अखण्ड राहिली तरी —

लाजवील चन्दना
तुझें चरित्र नन्दना !
उमल उमल तरि फुला
सुगंध वितरि भूतला !

ज्यांचिया पराक्रमें,
कला-गुणें, तपें, श्रमें,
येइ वैभवीं भरा
सुराज्य हें वटोदरा —

त्या अम्हां दिवंगतां
नसेच आस अन्यथा —
उजळवो अशा कुला
प्रभा त्वदीय उज्ज्वला.

उमल उमल गा फुला !
मधुर वितरि परिमला ! ७०

घुमून हें राहिलें गीत त्या कीर्तिमन्दिरामाजी
प्राशन केलें भाविकतेनें नृपतिमनें तें आजी
हवा कशाला प्रसाद त्यावर तीर्थ नि तो अङ्गारा ?
परि आचरती अचुक थोर ते लौकिक ही उपचारा ! ७४

ग्रं. क्र. ९६

# " जीन घर जीन तख्त "

## [ लष्करची सलामी ]

[ जाति—**अभिमन्यु** ]

शूर योध्यांचें
राज्य बडोद्याचें;
असें दळ बळचि नृपाळाचें.

निघाली म्हणुनी
स्वारी रायाची
सलामी घ्याया सैन्याची.

फुरफुरे घोडा
घोडा अबलख तो
लगामीं दुर्दम चुळबुळतो. १

सारखी मान
मान नाचवीत.
स्वतां जणुं करी कुर्निसात

झटकतां मान
उडते आयाळ
वारि कीं चवरी तेजाळ

आणि ते कान
कान तरतरीत
मोर्चेले जणूं चमकतात १८

मागुती पुच्छ
गमे डोलतांना
हालवी कुणी विंझणांना

नाचरी चाल
धरी ऐटदार
काढुनी छाती भरदार.

स्वार वरि कोण
वाजी ओळखतो
धनी ‘समशेर-बहाद्दर’ तो २७

धन्याची थोरी
थोरी भूषणशी
होतसे नेक नोकरासी

त्यांतुनी घोडा
जात इमानी ती
मूर्त ती जणुं सेवक-नीती

उचित, त्यावरुनी
स्वारी रायाची
सलामी घेई सैन्याची ३६

पाचुसम पगडी
गायकवाडी ती
झगमगे कलगि-तुरा वरती

आणि त्यांहुनि ती
कटीस समशेर
शोभते कुल-भूषा प्रखर

सरंजामांत
अशा निघे नाथ
सलामी दलाकडुन घेत. ४५

परत त्यापुढुनी
जातीं पायदळें
तशीं रणयंत्रें घोडदळें

अधिपती त्यांचे
देति इशाऱ्याचे
गर्जुनी हुकुम सलामीचे

प्रतिदलापुढतीं
विचरे जरिपटका
रणीं जो स्फूर्तिप्रद कटका

तसा ध्वज भगवा
डुले अग्रभागीं
लढविता जो सैन्यालागीं

भव्य तें दृश्य
दृश्य देखुनीयां
सलतसे सळ कांहीं हृदया

आणि त्यासरशीं
सैनिकांस नृपती
मनोगत अर्धस्फुट वदती :— ६३

“ अहो सैनिक हो
परम्परा तुमची
अलङ्कृति तीच खरोखरिची

" जाणता सकल
ब्रीदवाक्य तुमचें –
' जीन घर जीन तख्त ' साचें

" पूर्ण तो बाणा
बाणुनि घ्या अंगीं
जरी नच न्हाणे रणरंगीं ७२

" माळ विजयाची
सेनापतिस मिळे
पात्र परि तिज सैनिक सगळे

" बहादुरि अवघी
नसे इनामांत;
स्वकार्य-क्षेत्रिं इमानांत !

" म्हणुनियां स्तम्भ
पहा स्मारकांचे
अनामिक रणनिद्रिस्तांचे —

" उभे असलेले
वंद्य सर्व पथिकां
जहाले स्व-पर-राव-रंका !


“सलामी तुमची
म्हणुनि ललाम मला
नसे का मीहि तुम्हांमधला?” ८७

गुर्जरप्रभुचा
प्रतापसिंहाचा
दिलासा असा जिव्हाळ्याचा —

श्रवुनि, सेनानी
येउन सामोरा
नृपाच्या करि जयजयकारा.

तेंवि रणवाद्यें
जयघोषा-अन्तीं
गर्जुनी राष्ट्रगीत गाती.

तदा दुमदुमलें
अन्तराळ सारें
वटोदर-नृप-जयजयकारें. ९९



श्रीमंतांची स्वारी

# भाव-भेटीचा सोहळा

## [ पटेल-मतादारांचा दरबार ]

[ जाति—**चन्द्रकांत** ]

राजमहालद्वारीं आली बग्गी सोनियाची
कुठें निघाली स्वारी श्रीमत् प्रतापसिंहांची
वेळ जाहली घ्याया वर्दी जाती ए. डी. सी.
परन्तु नव्हती गरज वर्दिची आज नृपाळासी.
अभिषेकोत्सविं अहो आजचा विशेष दरबार
मानकरी-उमरावांचा जरि त्यांत न उपचार
किंवा प्रतिनिधि नव्हता येणें आंग्लभूपतिचा
स्वतन्त्र झाला होता प्रथमच तत्सन्मानाचा
मानपत्रवर्षाव जाहला दरबारीं अन्य
नृपाळ मानी परी आजचा अनन्य-सामान्य. १०

'येतीलच ते सखे आप्तजन अमीर उमराव
परन्तु माझ्या राज्यामधलें तें गांव-न्-गांव
मिळावेंच मज भेटायाला या मंगल समयीं,'
वत्सलतेची लाट ह्यापरी दाटुनिया हृदयीं
अखिल गांवचे पटेल सारे आज मतादार
स्वयंस्फूर्तिनें पाचारी नृप निज-राज्याधार. १६

विशाल मैदानावर मण्डप भव्य शामियाना
ध्वजा-तोरणीं लता-पल्लवीं स्वागत-सन्माना.
राजमार्गही जलसम्मार्जित होय शोभिवन्त
थरथरती तोरणें जयावर जणों मुदितचित्त
लोक दुतर्फा उभे पहाया, मधुन मोकळी वाट;
जेंवि दों तटीं प्रफुल्ल मळया, मधून सरितापात्र. २२

एकामागुन एक जाहल्या ललकाऱ्या तीन
देति इशारा 'स्वारी येऊं लागे मागून;'
दौडत आलें घोडदळाचें अघाडिचें पथक
निशाण-भाले रविकिरणामधिं दावितात चमक.
आणिक मागोमाग येतसे बगी सोनियाची
लक्ष्य मूर्ति जीमधें विराजे समस्त जनतेची.
"हैमरथावर रविकर पावति परावर्तनास
प्रभो, तेंवि करि परावर्तनक्षम नृप-चरितास"
अशी जनांच्या मनीं चमकली तों मंगल आस,
प्रगट जाहला आणि मुखांतुन नृपाळ-जयघोष. ३२

आणि मण्डपासमोर येतां रायाची स्वारी
ललकारी देतात गभीर-स्वरें वेत्रधारी
आणि तत्क्षणीं स्वागतार्थ हो वाद्यांचा गजर
दरबारामधिं देति खडी ताजीम मतादार. ३६

द्विज देती उगवत्या रवीला जेंवि अर्घ्यदाना,
रिवाज करणें तेंवि जनांनीं नृपास नजराणा.
रिवाज किंवा प्रजाधर्म तो म्हणुनि न ते सजले,
भावभक्तिनें विष्णुपूजना परि ते उत्सुकले.
जीवेंभावें म्हणुनि कराया सत्का उठतांना
व्यक्त वाङ्मयीं करूं पाहती आत्मभावनांना — ४२

घे खुशाल टिपुनी सुवर्ण कणकण !
लावुं नको परि अम्हां कराया —
कधीं कुणाच्या दारीं वणवण ! !

जिवापाड कधि खपुन रातदिन
सणासुदीला मारुनियां मन
किडुक-मिडुक जें गांठविलें रे —
येतां आफत न्याया निभवुन
तें हेंच ! — टिपुनि घे सुवर्ण कणकण !

भरुन ठेव तूं तव कोठारें
आणि जवाहिरखाने सारे
परन्तु गरजू हात आमुचे —
त्या पोंचाया न पडो अडचण.
घे खुशाल टिपुनी सुवर्ण कणकण !

दागदागिने सोस न आम्हां
साक्ष मिळे जरि अन्तर्यामा
तूंच अम्हांला आम्ही तुजला —
अनन्यसाधारण जरि भूषण.
घे खुशाल टिपुनी सुवर्ण कणकण.

धरितों आम्ही क्षेत्रीं नांगर
करूंहि आम्ही क्षेत्रीं संगर
परि परजाया येइ फाळ का —
निज निटिलाच्या निसणीवांचुन?
घे खुशाल टिपुनी सुवर्ण कणकण.

प्रणाम तुझिया कर्तृत्वाला
प्रणाम तुझिया थोरपणाला
करितांना परि हवें शरीरीं —
आपुलकीचें रुधिराभिसरण!
घे खुशाल टिपुनी सुवर्ण कणकण!

पंचांगाचीं उलटुन पानें
नको दिवाळी-दसरा बघणें
तुझिया राज्यीं मिळो न केव्हां —
अंधाराला अवसर कारण.
घे खुशाल टिपुनी सुवर्ण कणकण!

असें असो तव शासन-धोरण
व्हावें अवघें दैन्यनिवारण
जनीं पटो विश्वास 'उगवता —
दर दिन मंगल, सुवर्णदिन, सण'
घे खुशाल टिपुनी सुवर्ण कणकण.

भाव जाणुनी राजनिष्ठ त्या सकल पटेलांचा
उदारमति भूपती अन्तरीं द्रवे गुर्जरांचा
आणि करी जाहीर – "आजला नकोत नजराणे;
आपुलकीला हवा कशाला रिवाज आचरणें ?
तुम्हीच माझे खरोखरीचे आप्त जिव्हाळ्याचे
तुम्हीच माझ्या निर्मिते हो सौख्य-शान्ततेचे
धारण केला शीर्षावरती जो हा शिरपेंच
नोहे जनता-जनार्दनाच्या काय कृपेनेंच ?
रुळते माझ्या गळां अमोलिक जी मुक्तामाला
तुमच्या माझ्या न पूर्वजांचा प्रसाद हा ? बोला ?
छत्र शिरीं हें – राजेशाही काय अलङ्कार ?
हें तर म्हणतों 'प्रेमच तुमचें विलसे साकार !'
संरक्षक मजभंवति उभे हे दक्ष वेषधारी
विनावेष परि तुम्हीहि नच का हृदयामाझारी ?

म्हणोन पाचारिलें तुम्हांला समक्ष भेटीस
भेटीवांचुन न येइ दृढता भावबन्धनास !
खुल्या मनानें घडावयाच्या ह्या भेटीसाठीं
नजराण्याची, आहेराची कां आटाआटी ?
काय पाहिजे सत्क्यासाठीं तरि कांचनपुतळी ?
का न पुरेशी भक्ति तुमचिया जी लोचनयुगुलीं ?
ह्याच भक्तिची जरी निरन्तर द्याल मला जोड
शक्त होउं तरि परस्परांचें पुरवाया कोड
आणि जेधवां जाल परतुनी निज गांवोगांव
गांवकऱ्यांना आवर्जुन हा सांगा मद्भाव. ” १०४

व्यक्त मनोगत करून ऐसें, नृपाळ एकेका
पटेलास गौरवी देउनी कलगी पोषाखा.
वैयक्तिक भेटिची निशाणी देई स्वप्रतिमा
तृप्तकाम तैं पटेल गाती नृपतीचा महिमा.
आणि दीर्घ सुख आयु चिंतुनी राजदम्पतीस
निरोप घेती वानित त्या प्रिय औदार्योदधिस. ११०

[ जाति–**लवङ्गलता** ]

कष्ट न पडले त्यां ठेवाया नृपवचनाचें स्मरण
कारण तें राहिलें निनादुन त्यांच्या रंध्रांमधुन.

तेंवि नुरे तें गांवकन्यांना सांगायाची गरज
वृत्तविहंगम दिशा आक्रमी चारी आधीं सहज.
मात्र परतुनी पटेल गेले जेव्हां गांवोगांव
यात्रेकरुसम तयां दाविला गांवकन्यांनीं भाव. ११६

# धनी – नि – चाकर

## [ खास तैनाती नोकर-लोकांचा दरबार ]

[ जाति—**लवङ्गलता** ]

परोपरीच्या दरबारांची दंगल झाली सारी
अविश्रान्त तैनाती नोकर खपले अष्टौप्रहरीं. २

नजराण्यांनीं नृप गौरविला राजेरजवाड्यांनीं
सन्मानियलें परत नृपानें तयां त्याच रीतींनीं
अर्पियल्या निज काव्यालङ्कृति सादर कविरायांनीं
शब्दच केवळ त्यांचे त्यांना मणि-मोत्यांच्या खाणी
द्विजोत्तमांनीं नृपा पूजिलें वैदिक आशीर्वचनीं
उपकृत संस्था प्रशंसिती नृप मानपत्र अर्पोनी
नृपनिष्ठेला उचितच सगळीकडून येणें पूर
कृतज्ञतेनें तयांत सहजीं नृपती होई चूर
परन्तु सावधगिरी तयाची विशेष येई दिसुनी
कीं तैनाती नोकर झटती हेंही घेई ध्यानीं.

जाणतसे तो हवा गौरवावयासही निज दास
धनी करीना बूज तरी तो चाकर होइ उदास
पतकरलेलें काम करावें हा तर सेवक-धर्म
असलें धर्माचरण होतसें कोरडेंच परि कर्म
जीव घालुनी ज्यानें त्यानें करावेंच कर्तव्य
काय जिव्हाळ्याविना परन्तू होइल हें सम्भाव्य ?
जीवनकलहीं पैसा ठरला प्राणमन्त्र शस्त्रास्त्र
परन्तु पोटीं असे जिव्हाळ्यासाठीं जीव तृषार्त;
जागरूक तो लोकपाळ हें स्वयें घेउनी ध्यानीं
दरबारीं गौरवावया निज नोकरलोकां आणी. २२

दिवाणखाना भव्य सुशोभित करून ठेवियलेला
सरदारांनीं अधिकाऱ्यांनीं पूर्वी भूषविलेला
आज निमंत्रित परि तैनाती नोकरलोकच तेथें
विहरत होते येउनि पोटीं अभिमानाचें भरतें.
जाई उच्चारलें जेधवा एकेकाचें नाम
सन्मुख येउनि उभा राहि तो नृपास करुनि प्रणाम
आणि करी श्रीप्रतापनृपती विचारपूस तयाची
परितोषकाहुनी सेवका वाटे ती मानाची !
कुणास मंदिल, कुणा सलकडीं, कुणास लाभे कांहीं,
सुवर्णदानाविना कुणीही सुना राहिला नाहीं !

अशीं तयांना परितोषकें देई नृप निज हातीं
आपुलकीनें करावया दृढ धनी-नि-चाकर नातीं
सद्‌गदीत ते सेवक झाले पाहुनि ही नृपनीति
व्यक्त कराया भावभक्ति निज गाउं लागले गीती —३६

[ चाल–**तूं टाक चिरुनि ही०**– ]

करुं अम्ही आपुलें काम
पुरेसा दाम
द्या अम्हां; आमुच्या मिळो श्रमानें —
प्रभो ! तुम्हा आराम ॥ धृ. ॥

आजन्म पोषिली काया
काबाड-कष्ट उपसाया.
नच पुजाया नि कुजवाया;
तिज भूषण आणिक सार्थक अवघें —
सदा गाळणें घाम. ॥ १ ॥

झाडलोट प्रासादांची
करितांना वाञ्छिन यांची
आणखी चढावी उंची
मज निवाऱ्यास परि नका दाखवूं
दहा दिशांचें धाम. ॥ २ ॥

सजवीन सदा हौसेनें
आपुले पलंग-बिछाने
आम्हांस मात्र काम्बरुणें —
ती शेज धुळीची, उशी शिळेची
कधीं नसोत इनाम. ॥ ३ ॥

रावबा अशा रीतीनें
हाटका अशा वाणीनें
कीं दास्यहि व्हावें लेणें !
कोणीहि म्हणावें अम्हां " धन्याचे दोस्त;
नव्हेत गुलाम " ! ॥ ४ ॥

मग अपुले जरि पद-वेष —
भिन्न भिन्न, तरिहि हमेश —
आळवूं " अगा, परमेश !
येउं दे धन्याला उदण्ड बरकत
बढे रहे इतमाम !" ॥ ५ ॥ ६५

अनेक ऐसे आपआपुला पेशा पत्करलेला
करुं निष्ठेनें स्वयंस्फूर्तिनें ग्वाही देति नृपाला.

'अमुच्या दृष्टीआड न होइल इमानदारी कधिंही
दयावन्त तो नृपाळ त्यांना निर्वाळा तैं देई.
'धन्यास येवो उदण्ड बरकत' एकमुखीं सकलांनीं
आळविलें ईश्वरास होउनि विनम्र अन्तःकरणीं,
निरोप घेउनि उठे निघाया जेव्हां गुर्जरनाथ
जयजयकारासवें लवोनी जन करिती प्रणिपात. ७३

# अनुरञ्जन

[ जाति—**चन्द्रकला** ]

चला रसिक जन हो पहाया कवायती खेळ
श्रान्त मना ताजे-तवाने करणारे हेळ.
विशाल उद्यानें, मन्दिरें, शाळा, पडशाळा;
साधन-सामुग्री ज्यांमधें मनोरंजनाला
पुरविति जनतेला अहो जे सावधान नृपती;
गायकवाडांची त्यांतुनी विशेष ही ख्याती !
पहेलवानांचे पूर्वींचे पोशिन्दे राजे
साक्ष पहा तिकडे पवाडा फन्दीचा गाजे.
आणि पिढीपिढिला कीर्तिचें वाढत तें शिखर
किति सुखसोयींनीं सम्प्रतीं प्रफुल्ल हें शहर !
हवेंच जीवाला जगाया जसें अन्नपाणी
कामकरी जीवा पाहिजे विहार मैदानीं.
वाञ्छितात शिशुही घराच्या लङ्घाया भिन्ती
खुलेपणासाठीं भुकेले कृमी आणि दन्ती. १४

चला रसिक म्हणुनी पहाया कवायती खेळ
तृषित जिवासाठीं अहो हे तुडुम्बले हेळ.
दंगल खेळांची माजली चौकाचौकांत
इच्छाभोजन हें घालितो काय लोकनाथ.
प्रचण्ड तम्बू हा ठोकला विशाल मैदानीं
खेळ परोपरिचे चालले तयांत मर्दांनी.
कोणी खेळविती खेळण्यासमान निज देहां
'अस्थिविना कीं ते' मनीं ह्या उपजवि सन्देहा.
करुन घेइ कोणी जंगली जनावरांकडुनी
हवींत तीं कामें—मृत्युला काय राबवूनी !
वनीं टिपण साधी घ्यावया नरडीचा घोट
व्याघ्र तोच येथें आपुले सुळे दांत ओठ—
किति अलगत ठेवी धन्याच्या पहा गळ्याभवतीं;
काय अन्तरङ्गीं तयाच्या लहरी सळसळती !
लहर चाबकाच्या फटाक्याखालीं परि दबली
प्रतिकारासाठीं जरी तो गुरगुर करि दुबळी
पटपट करि कामें; सुटाया विटम्बनेमधुनी ?
काय गणी बरवें राहणें पिंजऱ्यांत पडुनी ?
तया प्रेक्षकांच्या वाटती टाळ्या शरवृष्टी,
पञ्जर त्यास रुचे जनांच्या चुकवाया दृष्टी. ३४

रंगणांत आले मागुनी लगबग हे दन्ती
म्हणाल तेथ उभे राहती ते बसती उठती.
मुकाटपण त्यांचें; — बाहुलीं जणुं कीं कळसूत्री —
निज शुण्डादण्डें सलामी अखेरीस देती. ३८

भाउबन्द त्यांचे परन्तू पहा आगडांत
फूत्कारें सजले कराया झुंज मदोन्मत्त
आणि कुणी ठाके कराया खेळ साठमारी
प्रचण्ड तरु ज्यानें उखडिले असतिल कान्तारीं.
अश्रु ठिबकती का तयाच्या नयनांतुन आज
कां क्रीडेमाजी तयाला मानहती लाज ?
चिडवाया त्यातें हालवी माहुतगण कोशे
चाल करुनि जाई तेधवां तो त्वेषें घोषें
आणि उडवितो तो सभोंतीं जों दाणादाण
तोंच पदीं चिमटे लागती मागुन करकचुन
क्षणांत होइ लुळा तेथल्या तेथ दीन वदन
करि अगतिकतेचें मानवापुढें करुण रुदन ! ५०

आगडांत ऐशा चालल्या किती तरी क्रीडा
वाटू लागतसे रंजनासवें मनीं व्रीडा ५२

पहा झुंजती हीं कोंबडी विस्फारुन गळ
तिथेंच आणि भुजा आपुल्या थापटती मल्ल.
पिळवटती देहा, बैठका काढतात कांहीं
आखाड्यामाजी उतरती तुमत तुमत पाही.
आणि लाल माती शरीरावरी उधळतात
आद्य दैवतातें आदरें काय पूजितात!
आणि करस्पर्शें वन्दुनी परस्परालागीं
करून डाव कुणी दुजाच्या चढे उरोभागीं.
आणि जयोन्मादें उडोनी दण्ड थापटीत
जयजयकार करी नृपाचा, घाली दण्डवत. ६२

महिष मागुती तों ठाकती अवखळ मुसमुसते
पकड वेसणीची सुटाया अधीर जे नुसते.
तैल-मर्दनानें जाहली तुळतुळीत पाठ,
लोचनांत धुन्दी दाटली किति कांठोकांठ,
कुठें प्रतिस्पर्धी पहाया गर्दन ती ताठ
दूर अजुनि केला नसे परि तो आन्तरपाट;
दूर जाहला तो, धडकले तोंच एकमेक
असेल हादरला तयानें शेषहि निमिषैक!
लपापतील न का काळिजें तरी प्रेक्षकांचीं
हवींत मत्त मनें पहाया क्रीडा मत्तांची! ७२

*          *          *

[ जाति—**पादाकुलक** ]

जमले सांघिक कवायतीला
शुभ्र वेष परिधान करोनी
भास होइ जणुं बलाकमाला
आली उतरुनि कीं मैदानीं

शीळ घालुनी देइ पुढारी
हुकूम वारंवार खुणांचे
युवकसंघ तों तदानुसारी
तालावरती थक्थय् नाचे

शिस्तवार तों खालींवरती
हस्तपाद-विक्षेप देखुनी
जलाशयीं जणुं वीचि धांवती
भास जाइ हा मनीं चमकुनी.

असंख्यात पद असंख्यात कर
एक सरीं ते अचूक सारे
विराट-देही गमे पुरुषवर
एकच जीवन ज्यांत सञ्चरे. ८८

* * *

पहा पहा हा इकडुन आला
दौडत घोडेस्वार वायुसम
तळपत त्याच्या करांत भाला
करावया संधान-पराक्रम.

मेख जमीनीमध्यें रोविली
स्वार तियेच्या ये रोखानें
मिळे इशारा, टाच मारिली
महादेव गर्जून मुखानें.

बघणाराची ठरे न दृष्टी
त्वेषें इतुक्या धावे वाजी
क्षणिं भाल्यावर मेख लटकते,
थक्क करी ती निशाणबाजी !

टेकिति घोडे जमीनीस का
टापा-सम्भ्रम पडे लोचनां
पहा धुळीचा उडतो भपका
प्रत्यय आणिक येतो काना

असे एकवर एक दौडती
लवे न पातें जों नयनाचें

नेम-शिताफी स्वार दाविती
वदे "वाहवा" जो तो वाचे. १०८

*  *  *

आणि पहा हा इकडुन आला
बहुरूप्यांचा एक घोळका
वेषान्तर तर किति बेमालुम
कोण कोण तो पहा ओळखा.

स्वार गर्दभावरी होउनी
बेलदार हे कोण पातले ?
अंग खापरी ओरखड्यांचें
—हे तर सेनापती आपुले !

आणि कोण हा दौडत आला
बसुनी भीमथडी तट्टावर
मणगट दणकट, खड्ग तयाला
भूषण, रुळते ढाल पाठिवर

आखुड अंगरखा नि काम्बळें
वहाण जाडी करकरणारी
कानीं बाळा, टिळा कपाळीं,
पीळ मिशीला भरला भारी.

अहो डोंगरी ज्या चुव्व्यानीं
    धुमाकूळ एकदां माण्डिला —
नव्हे; हिन्दुपदपादशाहिचा
    शौर्यस्थण्डिल जो धगधगला —

स्फुलिंग कीं हा एक तयांतिल
    साक्ष द्यावया नव्या पिढीला
समोर अपुल्या अहो ठाकला
    मर्द मराठा शूर मावळा !

नका नका हो पुलकित होऊं
    गताभिमानें भान विसरुनी
नव्या मनूमधिं वीरश्रीला
    चालणार हा साज कोठुनी ?

आपुलेच हे पलटणभाई
    नामी आले सोंग घेउनी
गौरवाई ते, — कीं शिवशाही
    सरकविली क्षण नयनांपुढुनी.

कुणी घालुनी बाराबन्दी
    चढवुन डोईवर पागोटें

भस्मपुण्ड्र चर्चून कपाळीं
 बनले भटजी कर्मठ मोठे !

कुणी बनीया काठेवाडी
 येइ लावुनी मिशा लोम्बत्या
करीं तयाच्या कीर्द-चोपडी
 हिशेबीच तत्स्वभाव जात्या !

उभा कोण धिप्पाड, ओळखा —
 पायघोळ तो किती चोळणा,
आखुड जाकिट, हा कादरखां
 — नामी सजलें सोंग, होय ना ? १५२

* * *

बहुरूप्यांचा ऐसा मेळा,
 नटली केवळ खिलाडु वृत्ती !
पद, पदवी, वय — मुळींच असला
 भेदभाव धरि कुणी न चित्तीं.

सोंग सजविणें हीहि जीवितीं
 कला साध्य पाहिजे जाहली.
नुसतें हासत खिदळत बघणें
 इतुकीच न योजना यांतलीं.

प्रिय अप्रिय वा प्राप्त भूमिका
तन्मयतेनें हवी कराया
करमणुकीस्तव हे नटलेले
हीच वाञ्छिती शिकवण द्याया. १६४

*    *    *

आणि खिलाडू कुणी धावती
उंच लांब उड्डाण घ्यावया
अधान्तरीं घेऊन दाविती
गिरक्या, वेळ न पुरे पहाया.

मेण्ड नि मुरक्या घेती ताना
गवयी अपुल्या आलापांनीं;
तेंच इथें परि लीला-लाघव
दाविति जन निज देहांकडुनी.

हुकमत पाहुन देहावरची
प्रेक्षक होती चकित सारखे
खेळाडू परि अतृप्त, कारण —
उडे शरीर न मनासारखें !

दूरदूरच्या वृक्षांवरले
शाखामृगही चीत्कारोनी
न्यून मानवी देहामधलें
पाहुनि दाविति कीं वेडावुनि !

परन्तु तिकडे लक्ष न देउनि
जळत्या वलयांतून अचानक
सूर मारुनी कुणी पुढें ये;
तया प्रशंसिति कुतुकें प्रेक्षक

असे मानवी सामर्थ्याचे,
चापल्याचे, करामतीचे,
खेळ पाहुनी जरा विसरतों
दुबळेपण आपुल्या तनूचें.

परन्तु येतां भानावरती
विषाद वाटे तीव्र अन्तरीं
सुखासीनतेपायीं झालों
गुलाम कुजक्या मात्र शरीरीं !

*　　*　　*

मराठी ग्रंथ ... न्यल ... सं. ... ता. ... ठा

असाच कोणी देहीं दुर्बल
पशुपक्ष्यांच्या बसुनि खनपटी
करवुनि दावी क्रीडा-कौशल
किती हिकमती, किती चिकाटी!

हेंच पहा ना पोपट इकडे :—
कुणी ढकलतो बाबा-गाडी
कुणी उघडुनी छत्री बसतो
दुजा तयाचा टांगा ओढी.

असुन पहा ते ज्ञातीबान्धव
एकाची करि सेवा दुसरा;
जें अवगत तें चोख बजावी
थारा भलत्या न दे विचारा.

कुणी धनुष्यावरी चढवुनी
बाण सभोंवति भरभर सोडी
कुणी पाहिजे तींच नेमकीं
तिजोरींतुनी नाणीं काढी.

अखेर कोणी भगवा झेण्डा
सरसर चढवी स्तम्भावरतीं;

ठासुनि दारू, तोफ डागतो,
सलामीच द्यावया शेवटीं.

जीव बिचारे चिमणे भीरू!
चिमकुलेच साहित्य तयांस्तव
सराइतापरि वापरती ते
तोफ दणकतां ब्रिचकती न लव. २१६

[जाति—**चन्द्रकला**]

खेळ परोपरिचे चालती मनोरंजनार्थ
मार्मिक त्यांमधला शोधिती अभिप्रेत अर्थ.
खेळ काय नुसते खेळुनी काळच दवडाया?
खेळांमधुनीही पाहिजे विक्रम साधाया!
विक्रम साधाया चिकाटी आणि हवे यत्न
यत्नवन्हिमाजीं खापरी शरीर हो रत्न.
चिपाड-तनु व्हाया हवी जर पोलादी काम्ब
अङ्गघर्षणानें पाहिंजे झिजवाया खाम्ब.
जरि देहामधुनी पाहिजे फांकाया तेज
येइल उपयोगी काय गा मऊ मऊ शेज? २२६

वरवर म्हणुनि जरी खेळ हे मनोरंजनार्थ
त्यांत अन्तरंगीं राहिला भरुन गूढ अर्थ
खेळ शर्यती ह्या कराया कालापव्यय का ?
कालापव्यय का तारितो कधीं राष्ट्रनौका ?
जरी राष्ट्रनौका तराया हवी सिंधु – खाडी
हवेत तरि तिजला खलाशी प्रवीण नावाडी.
आणि राष्ट्रनौका निराळी अलग कशी सांगा ?
असंख्यात मिळुनी जीव ती ये रूपा रंगा !
त्या हर जीवाचें जिणें तरि एकएक नौका
ती ज्याची त्यानें न्यायची टाळुनिया धोका
म्हणून राष्ट्रपती योजिती अशा चढाओढी
कीं ज्यानें त्यानें पुढें निज ढकलावी होडी.
वरवर म्हणुनि जरी खेळ हे मनोरंजनार्थ
त्यांत अन्तरंगीं राहिला भरून परमार्थ. २४०

खेळ असे खेळा पाहतां जे प्रेक्षकचित्तीं
आखाड्यांत उडी घ्यायची व्हावी स्फूर्ती
आणि खेळतांना ठेवणें अशीच कीं मुद्रा
ग्रहण न लागावें अपयशें उमेदिच्या चन्द्रा
आणि खेळतांना पाहिजे अशी चढाओढ
'न हा प्रतिस्पर्धी '– म्हणावें – ' हा चन्दनखोड !' २४६

*　　*　　*

जरी पढविलेला उडवितो पोपट हा तोफ
जरी पढविण्याचा कौतुकास्पदहि खटाटोप;
कौतुक तरि हें कीं पांखरूं मुळांत जें भ्याड
तें न रेस हाले उडे जरि तोफ धाडधाड.
अहो, शिकवियेलें तोफ ती तयास डागाया
भ्याडपणाचा तें सजे कीं स्वभाव जिंकाया.
पोपट हे पुसती "पिटाया कां जमला टाळ्या?
कां टाळ्या पिटुनी दावितां अम्हांस वांकोल्या?
जन्मजात आम्हीं जिंकलें निज दौर्बल्यास;
घ्या ध्यानीं हें कीं सर्वथा कारण अभ्यास" २५६

# रोशनाई


[ वृत्त—इन्द्रवज्रा ]

देवालयांच्या शिखरांवरोनी,
विद्यालयांच्या घुमटांवरोनी,
प्रासाद-भागीं, सदनीं, दुकानीं,
दीपावली पाजळल्या जनांनीं.

कोठें दिव्यांच्या रचिल्या कमानी
माला कुठें गुम्फियल्या तयांनीं
कोठें दिव्यांचे सर लोम्बतात
कोठें तयांनीं सृजिले किरीट.

शृङ्गार केला लतिकां-तरूनीं
दीपावली धारण कीं करूनी
चित्तांत ऐसा तरळे विचार
बागांमधोनी करितां विहार.

तीर्थोदकें जेंवि नृपाळ राणी,
विद्युत्प्रकाशें तशि राजधानी
वाटे निघे न्हाउनि काय सारी
हे वारिबिन्दू–नच दीप-हारी.



लक्ष्मीविलास राजवाड्याची रोषणाई

ही राजधानी नच, रुन्द लाम्ब —
हा आयना विस्तृत, त्यांत बिम्ब —
ज्योतिष्मती पाहतसे नटून
हो भास दीपावलि ही बघून.

ज्योती किती कांतिल डोलतात
कीं मोदवीची स्फुरती तयांत
कीं वांकुल्या दाविति त्या तमाला
या उत्सवीं वाव नसेचि ज्याला.

ह्या वांकुल्या हो परि कां तमाला ?
ह्या उत्सवीं का नच मोद त्याला ?
जी मानिता हो जन रोशनाई
ती ग्वाहि त्याची ‘ मम रोष नाहीं.’

ग्वाही मुखें तो नच केवला दे
देखा किती अन्तरिंच्या प्रमोदें
ती कृष्ण मुद्रा द्युतिरूप झाली
राजन्वती-संगत भद्र कालीं

दीपावलींतून कुठें विजेच्या
क्रीडा सुरू होति लपाछपीच्या
कांहींतुनी मङ्गल शब्दमाला —
‘ दीर्घायु आरोग्य मिळो नृपाला. ’ ३६

# आतषबाजी

[ वृत्त–सुरनिम्नगा ]

सुरसागरावर चाललें किति दारुकाम मनोहर
फुलतीं फुलें, सुटती नळे, धवळून टाकिति अम्बर
वर पोंचता कितिकांतुनी द्युतिगोलवृष्टि घडे पुन्हां
परि ते अधान्तरिं लोपती दिपवूनिया जनलोचनां.

कितिकांतले पडुनी जळीं करती स्फुलिंग चुरूचुरू
णितिकांतले नुसतेच कीं विझती उडून भुरूभुरू
नृपतीच्चिया शुभचिन्तनापुरतें प्रयोजन कांहिंचें
कितिकांतुनी 'शुभयामिनी' – वचनीं निरोप अखेरचे. ८

# भविष्य-दर्शन

॥ प्रसादचिन्हानि पुरःफलानि ॥

# भविष्य-दर्शन

[ वृत्त—**मन्दारमाला** ]

वेदोक्त झाले विधी ज्यांविना ती
            न वाटे मनातें शुचिर्भूतता
झाले समारम्भ दर्बार तैसे
            न ज्यांच्याविना उत्सवा भव्यता
देवाण-घेवाण झाली अहेरादि
            तीवांचुनी कोठली पूर्तता
सम्भावना, अन्न-वस्त्रादि-दानें,
            तयांविण कार्यास ना साङ्गता.

आले महाराज जे चक्रवर्ती,
            कुणी आप्त, विद्वान, बन्धू, सखे,
ते आयुरारोग्य चिन्तून भूपा
            निरोपास घेऊन जाती सुखें.
निश्चिन्त भूपप्रसादें जहालें
            असे गात जाती तयाची स्तुति.
कल्पून उत्कर्ष भावी स्वचित्तीं
            निघाले मतादार ते मागुती.

मार्गीतलीं तोरणें पल्लवांचीं
सुकूं लागतीं, रङ्ग मन्दावती.
आच्छादिती झुम्बरें आणि हण्ड्या
छतें झालरी लोक गुण्डाळती.
भेरी, तुतार्‍या, नगारे नि तोफा,
तसे चौघडे मूक झाले जरा.
स्वारांचिया थाम्बल्या येरझारा
निघाले विसाव्यास कर्ते घरा.

राज्याभिषेकोत्सवांतील ज्यांना
अहो, वाटलें हृद्य जें जें तयां
वाखाणती आठवोनी फिरोनी,
दुजें कांहिं पौरां न बोलावया.
जैसा महापूर तो ओसरोनी
उरे मूळचा ओघ पात्रांतला
तीरींचिया वृक्षमूलांसवें आणि
चाळा करी चालु तो आपुला.

सारे समारम्भ सम्पून सायन्तनीं
श्रान्त भूपाळ सौधावरी
विश्रान्ति एकान्ति सेवावया पातला
साधुनी शान्त ती शर्वरी.

आश्वासनें जीं दिलीं, तैंवि केल्या
प्रतिज्ञा, तशीं बान्धलीं कङ्कणें
होऊन साकार तच्चित्तचक्षूं–
पुढें लागतीं तैं करूं नर्तनें.

तत्रापि निद्रारता राजधानी,
वरी तारका गाति अंगाइला,
देखून तें दृश्य, सन्तोष-तन्द्रा
हळूं जोजवी मायशी त्याजला.
आकाशमार्गें विमानांतुनी तों
अकस्मात ठाके कुणी सन्मुख
चन्द्रप्रभेनेंहि लाजून जावें
अशी कान्ति दावी तियेचें मुख.

ऐशा मुखांतून ऐकावया काय
सङ्गीत येणार आतां तरी
हेलावया एक तैं हेंच औत्सुक्य
लागे नृपाच्या तदा अन्तरीं.
तों स्वप्नसौदामिनीनें फुलांचा
नृपाच्या पदीं वाहिला अञ्जली
तों पाकळी-पाकळींतून भृङ्गावली
तेथ गुंजावया लागली.

भृङ्गावली पावली मागुती तों
कळेना कधीं केंवि रूपान्तर.
मेळा तिथें गोजिऱ्या बालकांचा
धरी फेर नाचांत चेतोहर.
लोपून तैं सर्व गन्धर्वसृष्टी,
दिसूं लागलें राज्यसीमावृत—
एकेक खेडेंच, जें आदरानें
नृपालागिं आलापि सुस्वागत— ६४

“ आनन्द, आनन्द, सारा नृपाळा !
नसे न्यूनता येथ कांहीं कुणा.
वित्ता धनाढ्यांचिया येथ धोका
नसे, हाव नाहींच ती निर्धनां.
तेणेंच आतां धनाढ्यांसही प्रेम
वाटेच ना द्रव्यसम्पादना
साम्भाळिती त्यास लोकोपयोगीं
पुऱ्या मात्र पाडावया योजना. ७२

पेशामुळें उच्च वा नीच ऐसा
कुणी भेद आणीच ना मानसीं.
राजा, तुझ्या दूरदृष्टीमुळें सर्व
उद्योगधन्द्यांत राजीखुषी

गाळो कुणी घाम शेतावरी,
कारखान्यामधीं वा कुणाच्या घरीं
कष्टा मिळे मोल — वृद्धापकाळींहि
पोटास देईल जें भाकरी

अन्नामुळें येथ जैसा न मृत्यू
न तैसा कुणा रोगराईमुळें
आरोग्य हा व्यक्तिचा धर्म आधीं,
शरीरेंच हीं आमुचीं देउळें.
जैसे तरारून येती मळे, कीं
विनाकीड तीं अङ्गुरें, जाम्भळें,
तैशी प्रजा पाहुनी लेकरें हीं
न वात्सल्य कां त्वन्मनीं दाटलें !

फोंफावया विक्रमा सद्गुणां त्वां
अनिर्बन्ध ठेवीयलीं साधनें
फोंफावलेल्या अशांचींच माथां
अम्हां लाभतीं गाढ आच्छादनें.
हेवा तयांचा म्हणोनी न वाटे,
न ते वाञ्छिती फायदे अन्यथा
निर्लेप न्यायाङ्कित येथ सत्ता
प्रतापें तुझ्या नान्दते सर्वथा.

विद्या कला सिद्ध जो तो स्वताची
कुणाच्याहि लावावया कारणीं
वाञ्छा उबाडावयाची दुजा कां
तरी येथ व्हावी कुणाच्या मनीं ?
रूढींचिया थाम्बला देवळांतील
केव्हांच अन्याय्य घण्टारव.
न्यायासनाधिष्ठितां सम्पदेचा
भुलावूं शकेनाच गुंजारव. १०४

स्वस्थान येथें स्त्रिया जाणती,
त्यां रुचेना वृथा कींव वा गौरव.
सन्तान वाटे न ओझें कुणालाहि,
संसार सर्वां वसन्तोत्सव,
मूल्यें खरीं जाणिती लोक आतां,
तकाकीस भाळे न येथें कुणी.
कोणी फसेना मृगाम्बूस, हे तृप्त —
शुद्धोदकाचे झरे धुण्डुनी. ११२

तूं शक्त सर्वांचिया रक्षणातें,
कशानें अम्हां शत्रुची कल्पना.
तत्रापि झुंजावया आमुची ‘ ना ’
नसे, सर्वदा सिद्ध आम्ही रणा.

होतां कधीं क्षोभ दैवी, तयाच्या
तुवां आंखिल्या योजना वारणा
आम्हां भरंवसा तुझे बाहु
पेलावया सङ्कटीं शक्त गोवर्धना. १२०

क्षेत्रीं जसें पेरिलें बीज येई
हजारों पटींनीं जमीनींतुनी
तैशी तिजोरी जिथें तेथ कां गा
तगादे हवे द्यावया खण्डणी ?
राज्यांतल्या सम्पदेचा स्वतालागिं
विश्वस्त तूं मानिसी आपणा
कोठार समृद्ध तूझें कराया
म्हणोनी असे आंच अस्मन् मना. १२८

स्वातन्त्र्य वाञ्छी न कोणीहि येथें
समष्टीचिया घातकी जें हिता
“ माणूस वैरी नव्हे माणसाचा ”
अम्हां ठाउकी एवढी संहिता.
सन्तोष, सन्तोष, सन्तोष ऐसा,
अखेरी तरी मागणें एक कीं —
नान्दे सुराज्य प्रतापें जयाच्या
प्रभूनें नृपा राखणें त्या सुखी ” १३६

'सन्तोष ! सन्तोष !' एकेक खेड्यांतुनी
घोष ऐसा घुमूं लागला
वर्षाव चोंहीकडोनी फुलांचा
तदा मस्तकीं व्हावया लागला.
दाटून आला उमाळा नृपाच्या
मनीं, तो तसा पातला लोचनीं
झाला तया भास पुष्पांत त्या
गुम्फिल्या तारका दिव्य तेजोगुणीं.

आली अकस्मात तों जाग,
भूपाळ चोळून पाही तदा लोचन
तों देखिली राजधानी सभोंती,
वरी घालितें गस्त तारांगण.
स्वप्नामधें राज्य तें सौख्यसमृद्ध
देखून, लागे मना ओढणी.
राही उभा नम्र बद्धाञ्जली तो
उषागर्भ पूर्वेकडे पाहुनी.

दाटून रोमाञ्च आपादमूर्धा
क्षणीं पातले बोल ओठांवरी—
"माझ्या मला कारकीर्दीमधें ही
दिसो स्वप्नसृष्टी जहाली खरी"

[ छन्द—अनुष्टुप ]

नृपाच्या अन्तरात्म्याची याचना आर्त ऐकुनी
'तथास्तु' अश्रणी नादे नभाच्या घुमटांतुनी. १५८

# समर्पण

क्रा०

## समर्पण

# काव्य–किरीट
# कीं
# कीर्ति–किरीट
# कीं
# दिव्य–दर्पण

[ जाति–वल्लभा ]

नृपते ! तुझ्या सुहृदांचिया नच पंगतींतिल मी कुणी
राजा महाराजा न मी, मग आप्तता तरि कोठुनी
राज्यांतला उमराव वा दरबार-मानकरी नसे
' अपुला प्रजाजन ' ही मला म्हणवावया नच येतसे

ओवाळिलें कोणी तुला रत्नाचिया तबकांतुनी
सम्मार्जिलें तीर्थोदकें कनकाचिया कलशांतुनी
कुणि अर्पिलीं तुज भूषणें कलगी-तुरा, मुक्तामणी —
बघुनी जयांतिल जाहली कुजबूजही ताराङ्गणीं.

# काव्यकिरीट

राशी अहेरांच्या किती तरि भर्जरी पडल्या पुढें
अवलोकुनी झाले तयां गिरि उंचउंचहि बापुडे!
अभिनन्दनार्थ किती तुझ्या गुणगायनात्मक पत्रिका
संस्था समर्पिति आदरें, गङ्गौघ तो तव मस्तका.

आमात्य वारिति मोर्चलें, चवऱ्या, कुणी धरि छत्रही,
हृदयान्तरीं अभिसिञ्चिते अवघी प्रजा, अवघी मही.
मी तों कुणीतरि माण्डवी-नदिकांठचा खोऱ्यांतला
मग कोठुनी दिसणें मला घडला अलौकिक सोहळा.

परि भावबन्धन थोर कीं म्हणुनीच ही घटना घडे
'यशवंत' 'काव्य-किरीट' हा करि आदरें नृपतीपुढें
अथवा न 'काव्य-किरीट' हा; समजाच 'कीर्ति-किरीट' कीं
नृपते! शुभङ्कर हा तुझ्या विलसो निरन्तर मस्तकीं.

घडणावळीमधिं दोष ह्या जरि कांहिं आढळले तरी
उतरून, पाहत राहिलां जरि ह्याकडे धरुनी करीं
तरि हाच 'काव्य-किंरीट' होइल 'दिव्य-दर्पण' आपणां
[ करिजे क्षमा, इतुकी चमत्कृति साधते कविभाषणा. ]

मानावया नलगे उणा हा भूषणांहुनि आयना
रिझवील दर्पण आपुणां, भूषा परी इतरे जनां. २६

# परिशिष्ट--

--टीपा

# परिशिष्ट – टीपा

## वेशीवर

"यशोमंदिराची......दिधली" (चरणांक ३।४)— इ. स. १९२१ मध्यें बडोदें येथें साहित्याचार्य श्री. न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं मराठी साहित्य संमेलन झालें. त्या संमेलनांत प्रस्तुत कवीचा रसिकांकडून, त्याचप्रमाणें राजघराण्याकडून (श्री. महाराणी चिमणाबाई-साहेब यांचेकडून) प्रथम गौरव झाला.

"राजकवी" (चरणांक ७)–कै. कवि चन्द्रशेखर शिवराम गोऱ्हे.

'चिमणराव' (चरणांक १९)–प्रसिद्ध विनोदी लेखक चिं. वि. जोशी.

'राजरत्न' (चरणांक २२)–प्रसिद्ध कादम्बरीकार वा. वि. जोशी.

"ह्या राज्ञीवचनीं.....( चरणांक २८ )—श्री. सयाजीराव महाराज यांच्या गांठीभेटीचा हा उल्लेख आहे.

## सान्त्वन-सन्देश

नव्या राजवटीची सुरुवात उत्सवदृष्ट्या जरी राज्यारोहणसमारंभानें होत असली तरी एक लोकशास्ता जाऊन दुसरा लोकशास्ता जेव्हां कारभाराचीं सूत्रें हातीं घेतो तेव्हांपासूनच त्याची कारकीर्द व्यवहारतः सुरू होते. ह्या

दृष्टीनेंच, प्रस्तुत काव्याचें हें उपोद्घातवजा पहिलें प्रकरण उचितच वाटेल.

सन्देश (चरणांक १३६ ते २२३)—ता. २० फेब्रुवारी १९३९ रोजीं श्री. प्रतापसिंह महाराज यांनीं प्रजेला दिलेला सन्देश.

## तीर्थांस आवाहन

विश्वामित्री—बडोदें शहरांतून वाहत जाणारी नदी.

वितस्ता (स्वर्धुनी)—झेलम नदी.

"आत्मविसर्जन......दरी" (चरणांक ५०)—झेलमची सौन्दर्यसम्पन्न दरी पाहून, 'इथेंच आत्मविसर्जन करावें' अशी अकबर बादशहाला भूल पडली.

"तुझ्याच गेहीं तुला वाहते" (चरणांक १००) आणि "तुमचीच......जाणा" (चरणांक १०३)—नर्मदा, तापी, मही, साबरमती, मिन्दोल, अम्बिका, धातूर, पूर्णा ह्या नद्या बडोदें राज्यांतून वाहतात आणि ह्या सगळ्या विश्वामित्रीच्या मानानें मोठ्या आहेत.

"सखे सरस्वति......(चरणांक १०७।११५)—ही नदी अन्तःस्रोता आहे. पण ती गुप्तपणानें बडोद्यांतच वाहत आहे, अशी कल्पना केली आहे. श्री. सयाजीराव

महाराजांच्या कारकीर्दींत विद्येची अतिशय वृद्धि झाली, हा अर्थ ह्या कडव्यांत अभिप्रेत आहे.

आचार्य कालेलकर ह्यांचें "लोकमाता" हें पुस्तक ज्यांनीं वाचलें असेल त्यांना ह्या आवाहनांतील सन्दर्भ सहज समजतील.

## पूर्वसिद्धता

बिरुद-बिल्ले (चरणांक ५८)—"जीन घर, जीन तख्त" हें गायकवाड घराण्याचें ध्येयवचन असून, "सोन्डेंत मोर्चलें असलेल्या दोन हत्तींच्या पुढच्या पायांनीं धरलेला घोडेस्वार-युक्त बिल्ला" ही निशाणी आहे.

"गंगोत्पत्ती......आज" (चरणांक ११७)—श्री. प्रतापसिंह महाराज यांना मिति वैशाख शु।। ७ शके १८६१ रोज बुधवार (ता. २६ एप्रिल १९३९) ह्या दिवशीं राज्याभिषेक झाला. पंचांगांत 'गंगोत्पत्तिः गंगापूजनम्' असा ह्या तिथीचा विशेषत्वानें उल्लेख केलेला आहे.

## हुद्दे-पूजन

"जे प्रहार...बाळापुर–मैदानीं" (चरणांक ४२।४३)–ता. १० ऑगस्ट १७२० रोजीं वऱ्हाड प्रांतांतील बाळापुर गांवाजवळ (सैय्यदबंधूंच्या वतीनें) आलमअली व निजा-उल्मुल्ख यांच्यामध्यें लढाई झाली. तींत गायकवाडांनीं

आलमअल्लीच्या बाजूनें चांगलीच तरवार गाजविली. ह्या पराक्रमामुळें शाहूमहाराजांनीं दमाजी गायकवाडास ‘ समशेर बहाद्दर ’ असा किताब दिला.

“ थैमान. . .अंकलेश्वराच्या रानीं ” ( चरणांक ४४–४५ )—दिल्लीचे बादशहाचा जुन्नरचा व मुल्हेरचा सुभेदार या उभयतांनीं मिळून अहमदाबाद व सुरत या सुभ्यांची सनद मिळवून ते आपापल्या फौजांसह नर्मदेच्या दक्षिणेस अंकलेश्वराजवळ आले. तेथें दमाजीराव गायकवाड ( दुसरे ) यांच्याशीं त्यांची लढाई होऊन तींत हे दोघेही सुभेदार ठार झाले व दमाजीरावांस फार मोठें यश मिळालें.

“ बुरुजावर सोनगडाच्या० . . . ” ( चरणांक ४६।४७ )—सुरतेचा मुत्सद्दी शेख-उल-इस्लाम यानें आपले सरदार सैयद अकिल व महंमद पनाह यांच्या हाताखालीं फौज देऊन त्यांना पिलाजीराव गायकवाडांवर पाठविलें. पिलाजीरावांनीं त्यांचा पूर्ण पराभव केला व सोनगडावर आपलें मुख्य ठाणें बसविलें.

“हार जो गळां बिरुदांचा” ( चरणांक ६१ ) “ जें बिरुद मिरवितों” ( चरणांक ७८ )—‘ समशेर बहाद्दर ’ हा बडोद्याच्या गायकवाड राजघराण्याचा किताब आहे.

## राज्याभिषेक

ह्या समारम्भाचें वैदिक स्वरूप कायम राखण्यासाठीं, ह्या प्रकरणांत ज्या वेदमन्त्रांचा स्थूल अनुवाद केला आहे, आधार घेतला आहे, किंवा विस्तार केला आहे, ते मूळ-मन्त्र पुढीलप्रमाणें :—

### चरणांक १५ ते १८ :—

अस्मिन् राष्ट्रे श्रियमावेशाम्यतो देवीः प्रतिपश्याम्यापः ॥
देवा राष्ट्रस्य गुप्त्या अभयस्यावरुध्यै
आपः पादावनेजनीर्द्विषन्तं निर्दहन्तु मे ॥

### चरणांक ३५ ते ३८ :—

ॐ समुद्रज्येष्ठाः सलिलस्य मध्यात् पुनाना यंत्यनिविशमानाः
इंद्रो या वज्री वृषभो रराद ता आपो देवीरिह मामवन्तु ॥
ॐ आपो हि ष्ठा मयोभुवस्ता न ऊर्जे दधातन। महे रणाय चक्षसे ॥

### चरणांक ३९ ते ४४ :—

सोमस्य त्वा द्युम्नेनाभिषिञ्चाम्यग्नेर्भ्राजसा सूर्यस्य वर्चसे—
न्द्रस्येन्द्रियेण। क्षत्राणां क्षत्रपतिरेध्यति दिद्युन्पाहि ॥

[ शुक्ल यजुर्वेद, १०–१७ ]

का/०३
र. .....2

**चरणांक ४५ ते ५६ :—**

सुरः त्वां अभिषिंचंतु ब्रह्मविष्णुमहेश्वराः
वासुदेवो जगन्नाथः तथा संकर्षणः विभुः
ऋग्वेदोथ यजुर्वेदः सामवेदः तथैव च
अथर्ववेदः वेदाः त्वां अभिषिंचंतु पार्थिव
चित्रांगदः चित्ररथः चित्रसेनः च वीर्यवान्
एते त्वां अभिषिंचंतु गंधर्वाः पृथिविपते
अनुत्तमा सुरूपाच सुकेशी च मनोवती
एते त्वां अभिषिंचंतु राजन् अप्सरसः शुभाः
ऋतवः तथा मासाः पक्षाः रात्र्यहनी तथा
एते त्वां अभिषिंचंतु कालस्यावयवाः शुभाः
आदित्यः चन्द्रमा भौमः बुधजीवसितार्कजाः
ग्रहाः त्वां अभिषिंचंतु राहुकेतू च पार्थिव.

**चरणांक ७५ ते ८० :—**

ॐ मधु वाता ऋतायते मधु क्षरन्ति सिन्धवः ।
माध्वीर्नः सन्त्वोषधीः ।
मधु नक्तमुतोषसो मधुमत्पार्थिवं रजः ।
मधु द्यौरस्तु नः पिता ।
मधुमान्नो वनस्पतिर्मधुमाँ अस्तु सूर्यः ।
माध्वीर्गावो भवन्तु नः ॥

**चरणांक ८७ ते ९० :—**

कल्पन्तां ते दिशस्तुभ्यमापः शिवतमास्तुभ्यं भवन्तु सिन्धवः।
अन्तरिक्ष शिवं तुभ्यं कल्पन्तां ते दिशः सर्वाः ॥

[ शुक्ल यजुर्वेद, ३५–९ ]

**चरणांक ९१ ते १२२ :—**

ॐ आ ब्रह्मन्ब्राह्मणो ब्रह्मवर्चसी जायताम्। आ राष्ट्रे राजन्यः शूर इषव्योऽतिव्याधी महारथो जायताम्। दोग्ध्री धेनुर्वोढानडवानाशुः सप्तिः पुरन्ध्रिर्योषा जिष्णू रथेष्ठाः सभेयो युवास्य यजमानस्य वीरो जायताम्। निकामे निकामे नः पर्जन्यो वर्षतु फलवत्यो न ओषधयः पच्यन्ताम्। योगक्षेमो नः कल्पताम्।

[ शुक्ल यजुर्वेद, २२–२२ ]

**राज्यारोहण**

श्रीबेचराई—ग्रामदेवता

श्रीभोगेश्वर पंचायतन—गायकवाडांचें कुलदैवत.

"विख्यात हा कण्ठा गळां" (चरणांक ११६)–ज्या एका कंठ्याविषयीं बडोदें संस्थानची प्रसिद्धि आज त्रिखण्डांत झाली आहे, असा पन्नास लाख रुपये किंमतीचा बहुमोल मोत्याचा कण्ठा या मंगल समयीं श्रीमंतांनीं गळ्यांत घातला होता.

धडाड्धोम्...( चरणांक १५४–५६ व १७२–७४ ) —ह्या राज्यारोहणसमयीं जी तोफांची सलामी झाली तिचा पार्श्वसंगीतादाखल येथें उपयोग करून घेतला आहे. उद्‌धृत केलेल्या चालीची ध्वनिमुद्रिका ( "पुकार" चित्रपट H. M. V. N—15843 ) ऐकून बघणाराला ह्या पार्श्वसंगीताचें औचित्य ध्यानीं येईल.

**कीर्तिमन्दिराच्या गाभाऱ्यांत**

कीर्तिमन्दिर—बडोदें राज्याच्या उन्नतिसाठीं ज्यांनीं ज्यांनीं प्रयत्न केले आहेत त्या सर्वांचें व त्यांच्या सत्कृत्यांचें, जात, गोत, धर्म यांचा विचार न करितां, श्री. महाराज सयाजीराव गायकवाड ( तिसरे ) यांनीं उभारलेलें स्मारक.

"देह आणि गुण...आकल्पान्त" ( चरणांक ३५।३६ )

शरीरस्य गुणानां च दूरमत्यंतमंतरम्

शरीर क्षणविध्वंसि कल्पान्तस्थायिनोगुणाः ॥

या सुभाषिताचा अनुवाद.

**जीन घर, जीन तख्त**

जीन घर जीन तख्त—बडोद्याच्या राजघराण्याचें हें ब्रीदवाक्य आहे. घोड्यावरील जीन हेंच त्यांचें घर आणि जीन हेंच त्यांचें सिंहासन होय.

"अहो सैनिक हो....( चरणांक ६४।८७ )—ता. २८ एप्रिल १९३९ रोजीं लष्करची पाहणी केली, त्या

वेळीं श्री. महाराज प्रतापसिंह यांनीं केलेल्या भाषणाचा सारांश.

**भावभेटीचा सोहळा**—

सत्का करणें ( चरणांक ४१ )—ओवाळून सुवर्णमुद्रा ( पैसे ) टाकणें.

**आतषबाजी**

सुरसागर—बडोदें राजधानींतील तलाव.

**काव्यसमर्पण**

"मी तों कुणी......खोऱ्यांतला" ( चरणांक १५ )—माण्डवी उर्फ माण्ड ही नदी चाफळखोऱ्यांतून वाहते-कवीची जन्मभूमि.

REFBK-0006043

REFBK-0006043